# बृहन्महाराष्ट्र वृत्त

वर्ष ४६
अंक ९

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २०२६
श्रावण / भाद्रपद
शके १९४८


नमस्कार,

नव्या पर्वाची नांदी — संस्कृती, सहभाग आणि संकल्प



“श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे; क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे...” श्रावणाची ही प्रसन्न चाहूल मनाला नव्या उत्साहाने भरून टाकते. निसर्ग जसा नव्या पालवीने बहरतो, तसाच आपल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नव्या पर्वालाही आज सुरुवात झाली आहे.

निवडणूक आता संपली आहे. कोण जिंकले, कोण हरले यापेक्षा जिंकल्यानंतर आपण काय करतो, हे माझ्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे. निवडणूक हा केवळ एक टप्पा आहे; खरी परीक्षा आता सुरू होते. पुढील दोन वर्षे BMM साठी अत्यंत सुंदर, फलदायी आणि संस्मरणीय करण्यासाठी आम्ही सज्ज होत आहोत. या प्रवासात BMM च्या इतिहासातील आजपर्यंतचा सर्वात तरुण अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचा मला मनापासून अभिमान आहे. हा अभिमान माझ्यासाठी केवळ वैयक्तिक यश नाही, तर त्यासोबत आलेली मोठी जबाबदारी आहे. तरुण नेतृत्वासोबत नवी ऊर्जा, नवे विचार, आधुनिक तंत्रज्ञान आणि पुढच्या पिढीला सोबत घेऊन BMM ला पुढे नेण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न असेल. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक सदस्याचे आणि BMM परिवाराचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या नव्या कार्यकारिणीतील सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**राहुल देशमुख, नरेंद्र कल्याणकर, अमित कोर्डे, मिलिंद कुलकर्णी, हृषीकेश रानडे, ज्योत्स्ना कुरकुटे, उल्का नगरकर, संदीप पवार आणि हर्षद अन्निगेरी** — आपल्या सर्वांवर BMM परिवाराने विश्वास टाकला आहे. हा विश्वास म्हणजे केवळ पद नाही, तर एक मोठी जबाबदारी आहे. प्रत्येकाच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रमांना नवी दिशा मिळणार आहे. मराठी शाळा, इतिहास मंच, मोडी लिपी, अधिवेशन, मैत्री मेळावा, युवा विभाग, ध्वनिमुद्रित कार्यक्रम, अंतरंग, त्रैमासिक लेखापरीक्षण, संकेतस्थळ, वृत्त, आधार, वस्तू विक्री केंद्र, भारतातील कार्यक्रम, आरोग्य संपदा, ध्यानधारणा, क्रीडा, रेशीमगाठी, अर्थमंथन, मराठी बोलीभाषा, संस्कृत अध्ययन, कीर्तन, वारसा, बागकाम, प्रवास, बी-कनेक्ट, तांत्रिक सहाय्य, समाजरंग, छायाचित्रण, उत्तररंग, पौरोहित्य, तत्त्वज्ञान, ज्योतिष आणि लक्षवेधी अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून आपण उत्तर अमेरिकेतील आणि जगभरातील मराठी समाजाला जोडण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ही कार्यकारिणी आपली आहे आणि हे BMM देखील आपलेच आहे. त्यामुळे मतभेद असतील तर ते विचारांचे असावेत, मनांचे नाहीत; आणि प्रत्येकाने या प्रवासात आपले योगदान द्यावे, हीच अपेक्षा. श्रावणानंतर आता आपल्या सर्वांच्या आवडीचा आणि उत्साहाचा ‘गणेशोत्सव’ दारात आला आहे. गणपती म्हटले की माझ्या मनात अनेक आठवणी जाग्या होतात. महाविद्यालयीन दिवसांत पुण्यात तुळशीबागेसमोर गणपतीच्या मिरवणुकीत ताशा वाजवण्याचा मला मोठा छंद होता. ढोल-ताशांचा तो नाद, गर्दीचा उत्साह, गणपती बाप्पाचा जयघोष आणि त्या वातावरणात जाणवणारी एकजूट — हे सगळे आजही मनात ताजे आहे. अमेरिकेत आल्यानंतरही हा छंद मी सोडला नाही. वेगळ्या देशात, वेगळ्या वातावरणात राहूनही आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवणारा हा अनुभव माझ्यासाठी नेहमीच खास राहिला आहे. आपली संस्कृती आपण जपायचीच नाही, तर पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायची आहे, आणि त्यासाठी प्रत्येक मंडळाची भूमिका महत्त्वाची आहे. यावर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने BMM मधील प्रत्येक मंडळाने आपापल्या गणेशोत्सवाच्या आठवणी, परंपरा, आगळे-वेगळे उपक्रम, मुलांचा सहभाग, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रमांची छायाचित्रे आणि ध्वनिचित्रफिती आमच्यासोबत जरूर शेअर कराव्यात. हे अनुभव फक्त आपल्या मंडळापुरते मर्यादित न राहता संपूर्ण BMM परिवारापर्यंत पोहोचावेत, यासाठी ते BMM च्या समाजमाध्यमांवरील पानांवर — इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर शेअर करूया.

एका मंडळाची कथा दुसऱ्या मंडळाला प्रेरणा देऊ शकते. आपले सण, आपल्या परंपरा आणि आपल्या पुढच्या पिढीचा सहभाग — हाच आपल्या मराठी समाजाचा खरा ठेवा आहे. गणपती बाप्पाच्या आगमनाबरोबरच आपण या नव्या BMM पर्वाची सुरुवात करूया. नवीन ऊर्जा, नवीन कल्पना, नवीन नेतृत्व आणि सर्वांचा सहभाग यांतून पुढील दोन वर्षे BMM च्या इतिहासातील एक सुंदर पर्व ठरवूया. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दांत— “आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥” माऊलींच्या या पसायदानातून प्रेरणा घेऊन आपल्या सर्वांच्या कार्याला समाजहिताची, संस्कृतीची आणि एकतेची दिशा मिळो, हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना. गणपती बाप्पा मोरया!

BMM परिवाराच्या नव्या पर्वाला मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला, **राहुल देशमुख**, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Milind Kulkarni**
**16077 Caminito Tomas, San Diego, CA 92128**
**Ph: 408.600.4486**
**Email: milind.kulkarni@bmmonline.com**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२६ - २०२८)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
उपाध्यक्ष: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
सचिव: अमित कोर्डे, रिचमंड, व्हर्जिनिया
कोषाध्यक्ष: मिलिंद कुलकर्णी, सॅन डिएगो, कॅलिफोर्निया
सदस्य: उल्का नगरकर, शिकागो
ज्योत्स्ना कुरकुटे, कनेटिकट
संदीप पवार, कॅलगरी, कॅनडा
ऋषिकेश रानडे, टोरांटो, कॅनडा
हर्षद अण्णेगिरी, डेट्रोइट

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
सदस्य: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी (२०२६ - २०२८) | ३ |
| संपादकीय प्रवासातील स्थित्यंतर | ४ |
| एका ऐतिहासिक अधिवेशनाचा अविस्मरणीय प्रवास! | ५ |
| A Journey of Vision, Teamwork & Togetherness” | ६ |
| BMM Seattle Day 0 Feedbacks | ८ |
| बीएमएम २०२६ सिॲटल अभिप्राय | १० |
| बीएमएम युवा विशेष | १४ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | १६ |
| जाहिरात | १८ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | १९ |
| यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः | २१ |
| कविता: मोरया | २३ |
| रोमन: एका दुर्बिणीचा दीर्घ प्रवास | २३ |
| कविता: घोर | २६ |
| अक्षरसंवाद - पत्रलेखन कला - काल, आज आणि उद्या | २७ |
| कविता: कळेल का कधी तुला...! | २८ |
| ग्लोबल महाराष्ट्रीयन अवॉर्ड्स २०२७ | २८ |
| कविता: आला श्रावण | २९ |
| आनंदाचे देणे | २९ |
| कविता: पारिजात | ३१ |
| दिवाळी अंक आवाहन २०२६ | ३२ |
| MANA Paintings | ३३ |
| जाहिरात | ३४-४३ |


## संपादक समिती

ऋषिकेश रानडे
अपर्णा कोळेकर
शीतल रांगणेकर
गौतम पंगू
कोमल कुलकर्णी
विदुला कोल्हटकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Vrutta@Bmmonline.org

# BMM Executive Committee 2026-28

## बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी २०२६-२८



**PRESIDENT**

## Rahul Deshmukh

**Portfolio:** Marathi Shala

**City:** Pittsburgh, PA

**अध्यक्ष**

## EXECUTIVE COMMITTEE



### Narendra Kalyankar
**Vice President**

**Portfolio:** Karaoke, Gurupith

**City:** Raleigh, NC



### Amit Korde
**Secretary**

**Portfolio:** NA Programming

**City:** Richmond, VA



### Milind Kulkarni
**Treasurer**

**Portfolio:** Podcast, Antarang, Financial Compliance & Audit

**City:** San Diego, CA



### Harshad Annigeri
**EC Member**

**Portfolio:** Uttar Rang, Paurohitya, Tatvadnyan, Jyotish, Lakshvedhi, MANA

**City:** Detroit, MI



### Jyotsna Kurkute
**EC Member**

**Portfolio:** India Programming, Arogya Sampada, Sports

**City:** Connecticut, CT



### Rushikesh Ranade
**EC Member**

**Portfolio:** Yuwa, Social Media, Website and Adhar

**City:** Toronto, ON, Canada



### Sandip Pawar
**EC Member**

**Portfolio:** B-Connect, Samajrang, Tech Admin

**City:** Calgary, AB, Canada



### Ulka Nagarkar
**EC Member**

**Portfolio:** Reshimgathi, Arth Manthan, Marathi Boli Bhasha, Sanskrit Learning, Vaarasa

**City:** Chicago, IL

## BOARD OF TRUSTEES

**विश्वस्त मंडळ**



### Sandeep Dixit
**Trustee**

**City:** Mayfield Village, Ohio



### Sunil Suryawanshi
**Trustee**

**City:** Ridgefield, CT



### Manjusha Naik
**Trustee**

**City:** West Palm Beach, FL

Bruhan Maharashtra Mandal of North America

Source: BMM Committee page • 2026-28

## संपादकीय प्रवासातील स्थित्यंतर



**डॉ. गौतम पंगू**

या अंकाद्वारे आम्ही वृत्ताच्या संपादकीय प्रवासातील एका महत्त्वाच्या स्थित्यंतराची नोंद करत आहोत.

गेल्या दोन वर्षांपासून वृत्तासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल आम्ही **अनिता कांत** यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या नेतृत्वाने वृत्ताला आकार देण्यात आणि ते पुढील स्तरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. BMMच्या विविध उपक्रमांमधील त्यांच्या पुढील योगदानासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा.



**अनिता कांत**

तसेच, गेल्या चार वर्षांहून अधिक काळ वृत्ताच्या कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या **शुभदा सावरगावकर** आणि **नीता धोपेश्वरकर** यांचेही आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या पुढील वाटचालीस आमच्या हार्दिक शुभेच्छा.



**शुभदा सावरगावकर**



**नीता धोपेश्वरकर**

**डॉ. गौतम दिलीप पंगू** यांची BMM वृत्तच्या संपादकपदी नियुक्ती झाल्याचे सांगताना आम्हाला आनंद होत आहे.

रसायन अभियांत्रिकीमध्ये पीएच.डी. असलेले डॉ. पंगू सध्या फिलाडेल्फिया येथे औषधनिर्माण क्षेत्रात संशोधक म्हणून कार्यरत आहेत. गेली १५ वर्षे कथा, ललित आणि वैचारिक लेखनात सक्रिय असलेल्या डॉ. पंगू यांचे लेखन अनेक नामांकित प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या नावावर पुरस्कारप्राप्त कथा, पाच ऑडिओबुक्स तसेच पाच मराठी चित्रपटांचे पटकथालेखन आहे.

🌸 **डॉ. गौतम पंगू** यांचे मनःपूर्वक स्वागत आणि नव्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद आणि नम्र अभिवादन,<br>
**श्री. ऋषिकेश रानडे (Rushikesh Ranade)**<br>
कार्यकारिणी सदस्य (EC Member & Lead: Yuva, Vrutta, Social Media, Webadmin & Aadhar)<br>
बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) २०२६-२८<br>
उत्तर अमेरिका (अमेरिका + कॅनडा)



## “जपूया संस्कृती, विणूया नाती” — एका ऐतिहासिक अधिवेशनाचा अविस्मरणीय प्रवास!

नमस्कार मंडळी,



सिएटल येथे संपन्न झालेले BMM २०२६ अधिवेशन आता आपल्या सर्वांच्या मनात अनेक सुंदर आठवणींचा ठेवा बनून राहणार आहे. जवळजवळ दोन वर्षे ज्या स्वप्नासाठी शेकडो हात अथक परिश्रम घेत होते, ते स्वप्न अखेर प्रत्यक्षात साकार झाले. या संपूर्ण प्रवासाकडे मागे वळून पाहताना मनात सर्वप्रथम एकच भावना येते — कृतज्ञता!

या अधिवेशनाचे खरे शिल्पकार म्हणजे आपले स्वयंसेवक. गेली दोन वर्षे स्वतःचा वेळ, कुटुंब, काम आणि वैयक्तिक जबाबदाऱ्या सांभाळत असंख्य स्वयंसेवकांनी या अधिवेशनासाठी अथक परिश्रम घेतले. BMM अधिवेशन हे प्रामुख्याने स्वयंसेवकांच्या बळावर उभे राहणारे आयोजन आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्रमात अनेकदा मोजकेच स्वयंसेवक एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या सांभाळतात. प्रसंगी आपल्या अनुभवाच्या बाहेरची जबाबदारीही केवळ गरज म्हणून स्वीकारावी लागते. अशा असंख्य आव्हानांवर मात करत, कोणत्याही अपेक्षेशिवाय काम करणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाला माझा मनापासून सलाम आणि धन्यवाद!

या अधिवेशनाचे ब्रीदवाक्य होते — “जपूया संस्कृती, विणूया नाती.” हे केवळ ब्रीदवाक्य नव्हते, तर या संपूर्ण अधिवेशनामागची भावना होती. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आपण आपली मराठी भाषा, कला, परंपरा आणि संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला, तर उत्तर अमेरिकेच्या कानाकोपऱ्यातून एकत्र आलेल्या मराठी बांधवांनी जुनी नाती अधिक घट्ट केली आणि अनेक नवीन नाती जोडली. अनेक वर्षांनी भेटलेले मित्र, विविध पिढ्यांचा सहभाग, भारतातून आलेले पाहुणे आणि कलाकार, तसेच उत्तर अमेरिकेतील आपल्या समाजाचा उत्स्फूर्त सहभाग — या सर्वांतून आपण खऱ्या अर्थाने संस्कृती जपली आणि नाती विणली.

हे अधिवेशन आणखी एका विशेष कारणामुळे ऐतिहासिक ठरले. मराठी भाषेला ‘अभिजात भाषा’ हा प्रतिष्ठेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर उत्तर अमेरिकेत आयोजित झालेले हे पहिले BMM अधिवेशन होते. त्यामुळे या ऐतिहासिक अधिवेशनाला महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले विशेष सहकार्य आणि आर्थिक पाठबळ आमच्यासाठी अत्यंत मोलाचे आणि अभिमानास्पद होते. महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीसजी तसेच मराठी भाषा व उद्योग मंत्री श्री. उदय सामंतजी यांनी BMM २०२६ अधिवेशनासाठी दिलेल्या उदार अनुदानाबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञ आहोत. अभिजात मराठी भाषेचा गौरव सातासमुद्रापार साजरा करताना महाराष्ट्र शासन आपल्या पाठीशी उभे राहिले, ही उत्तर अमेरिकेतील संपूर्ण मराठी समाजासाठी अभिमानाची बाब आहे. तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदेजी यांनी डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून दिलेल्या उदार देणगीबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार. महाराष्ट्र आणि उत्तर अमेरिकेतील मराठी समाजामधील नाते अधिक दृढ करण्यासाठी मिळालेले हे सहकार्य आम्हाला कायम स्मरणात राहील.

या अधिवेशनाच्या यशामागे आपल्या सर्व देणगीदार आणि प्रायोजकांचाही अत्यंत मोलाचा वाटा आहे. COVID नंतर अन्न, प्रवास, मनुष्यबळ आणि आयोजनाच्या खर्चात झालेली मोठी वाढ, महागाई, कठीण आर्थिक परिस्थिती, नोकरीच्या बाजारातील अनिश्चितता आणि मर्यादित sponsorship यामुळे सिएटलसारख्या महागड्या शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर अधिवेशन आयोजित करणे हे एक मोठे आर्थिक आव्हान होते. एक वेळ अशीही आली होती की संभाव्य मोठ्या आर्थिक तोट्यामुळे अधिवेशन रद्द करण्याचाही गंभीरपणे विचार करावा लागला. मात्र त्यानंतर अनेक काटकसरीचे निर्णय घेतले, खर्चावर नियंत्रण आणले आणि प्रत्येक बाबतीत शक्य तेथे बचत करण्याचा प्रयत्न केला. या कठीण काळात आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या प्रत्येक प्रायोजक आणि देणगीदारांचे मनःपूर्वक आभार! तुमच्या आर्थिक पाठबळाशिवाय हे अधिवेशन प्रत्यक्षात आणणे शक्य झाले नसते.

गेली दोन वर्षे माझ्यासोबत अत्यंत संयमाने काम करणाऱ्या BMM Executive Committee, Board of Trustees, संपूर्ण Seattle Convention Team तसेच या सर्व स्वयंसेवकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांचे मी विशेष आभार मानतो. या अधिवेशनासाठी

स्वयंसेवकांनी दिलेल्या असंख्य तासांमागे त्यांच्या कुटुंबीयांचा त्याग, समजूतदारपणा आणि पाठिंबाही तितकाच मोलाचा होता.
हा प्रवास कधीच सोपा नव्हता. अनेक मोठी आव्हाने आली, काही विषयांवर मतभेद झाले, कधी चर्चा वादळी झाल्या, तर काही निर्णय घेणे अत्यंत कठीण गेले. पण या सगळ्यापेक्षा आपले एक समान ध्येय होते ते म्हणजे BMM २०२६ हे अधिवेशन यशस्वी करायचे! विचारांमध्ये मतभेद झाले, पण ध्येयामध्ये कधीच मतभेद झाले नाहीत. प्रत्येक आव्हानाच्या वेळी आपण समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला, एकमेकांसोबत राहिलो आणि शेवटपर्यंत एक टीम म्हणून काम केले. हेच या अधिवेशनाच्या यशाचे सर्वात मोठे कारण आहे.

एवढ्या मोठ्या स्वरूपाच्या अधिवेशनात प्रत्येक अनुभव प्रत्येकाच्या अपेक्षेनुसार असेलच असे नाही. काही कार्यक्रमांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, तर काही कार्यक्रमांबद्दल नकारात्मक मते व्यक्त झाली. आमच्या प्रामाणिक प्रयत्नांनंतरही काही बाबतीत त्रुटी किंवा कमतरता राहिल्या असतील, याची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळे कुणाची गैरसोय झाली असेल किंवा कुणाचा अपेक्षाभंग झाला असेल, तर त्याबद्दल मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. प्रत्येक अनुभवातून शिकत, जे चांगले झाले ते पुढे नेत आणि जिथे सुधारणा आवश्यक आहे तिथे योग्य बदल करत पुढील अधिवेशन अधिक उत्तम करण्याचा प्रयत्न करणे, हीच या प्रवासाची खरी शिकवण आहे.

आणि शेवटी सर्वात महत्त्वाचे आभार — या अधिवेशनाला उपस्थित राहिलेल्या तुम्हा सर्वांचे! हजारो मैलांचा प्रवास करून, वेळ आणि पैसा खर्च करून तुम्ही सिएटलला आलात. जुन्या मित्रांना भेटलात, नवीन मैत्री केलीत, आपल्या मराठी भाषा आणि संस्कृतीचा आनंद घेतलात आणि या अधिवेशनाला खऱ्या अर्थाने जिवंत केलेत. तुमच्याशिवाय अधिवेशनाला अर्थ नाही — आणि मजाही नाही!

शेवटी BMM अधिवेशन म्हणजे केवळ नाटक, संगीत, जेवण किंवा कार्यक्रमांची मालिका नव्हे. दर दोन वर्षांनी आपल्या माणसांना भेटण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची, नवीन नाती जोडण्याची आणि आपल्या मराठीपणाचा एकत्रित उत्सव साजरा करण्याची ही एक अनमोल संधी आहे.

या दोन वर्षांच्या प्रवासात माझ्यासोबत चाललेल्या प्रत्येक स्वयंसेवकाला, BMM आणि Seattle नेतृत्वाला, देणगीदारांना, प्रायोजकांना, महाराष्ट्र शासनाला, कलाकारांना, पाहुण्यांना आणि हजारो उपस्थित रसिकांना परत एकदा मनःपूर्वक धन्यवाद!

सिएटलच्या या सुंदर आठवणी मनात जपूया, आपण निर्माण केलेली नाती अधिक दृढ करूया आणि आपल्या ब्रीदवाक्याप्रमाणे आपणही — “जपूया संस्कृती, विणूया नाती!”
पुन्हा भेटूया पुढच्या BMM अधिवेशनात! मनःपूर्वक धन्यवाद!
जय हिंद - जय महाराष्ट्र & God Bless North America!

- **प्रसाद पानवळकर**, माजी अध्यक्ष
बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM), उत्तर अमेरिका

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## “BMM 2026 Seattle Convention – A Journey of Vision, Teamwork & Togetherness”

**The highlight of BMM 2026 was :** We were able to distribute 300 Bhagwad Gita books during the convention!!

Congratulations to **Rahul Deshmukh** and **BMM 26-28 EC!!** Thanks to **Mohit Chitnis** and **Prasad Panwalker.**

When I look back at the journey of BMM Initiatives, I feel immense gratitude and pride.

Our planning began almost two years ago. What started as an idea grew into multiple initiatives, each led by passionate chairs, co-chairs, volunteers, artists, parents, and community members. There were many challenges, changes, budget discussions, ups and downs—but together, we kept moving forward.

**Our BMM Initiatives Teams** :

**Artist Gallery** – Kalaspandan: Vinita Mohite, Rajani Patil, Tanvi Patil, Sheetal Rangnekar, Manjiri Kharkar, Prerana Kulkarni , Reshma Joshi, Rashmi Panse, Prachi Kulkarni.

**Baltarang & Kishorkunj:** Veena Bhoite, Ketki Seth, Madhura Bhatavdekar, Pallavi Deshpande, all program leads.

**Ekankika Spardha** – Natyasrujan: Abhijeet Rane, Sukhada Deodhar, Amit Deodhar, Ashwini Deodhar,

Rama Kelkar, Chetan Chudasama, Shantanu Moghe and Aniket Sapre.

**Yuwa:** Saloni Nagarkar, Savni Nagarkar, Aditi Patange, Sanika Joshi, Kanaad Deodhar, Anita Tak, Anand C.

**Uttarrang:** Shweta Patwardhan, Usha Adgaonkar, Harshada Padhye, Abhijeet Rane and Anupama Malekar

**B-Connect & Real Estate:** Kailas Bhoite, Amit Doiphode, Pankaj Khanzode, Aniket Malatpure, Abhijit Joshi, Divya Kulkarni, Aniket Kulkarni, Hrushikesh Gandhi, Aarya Bhoite, Aditya Doiphode, Chetan Thorat.

**Real Estate Conference :** Nilambari Karkar, Sunil Birari, Sandeep Chaddha, Hrushikesh Gandhi.

CME: Dr. Aarti Tayade, Dr. Aarti Deshpande, Dr. Komal Patil, Dr. Mohan Durve.

**Reshimgathee:** Rupali Ghanekar, Savita More, Runa Chitnis, Asmita Parab and team.

A special thank you to our Marketing & Social Media Team—Parag Shasrabudhe, Sukhada Deodhar, Sheetal Rangnekar and the VSS team from India.

**Web Team:** Ambar Rasal, Ashwini Kshirsagar, and Rajani Patil.

**AV Team:** Milind Jambhekar and Sandeep Shahane; **Registration Team**: Reetu Chudasama, Jyoti Rasal, Shraddha Deodhar and Mrudani Panchakshari; and **Facility Team:** Apurva Chinchwadkar and Ninad Lade. We couldn't have done without **sponsorships:** Thank you to our local sponsors: Vamshi Reddy and **BMM EC:** Medha Godbole, Anand Chouthai!

And a heartfelt thank you to every chair, co-chair, volunteer, parent, artist and supporter who contributed to making these programs successful.

We were able to distribute Bhagwat Gita during convention!! Thanks to our convener **Mohit Chitnis!!**

**What We Created Together:** It was truly a roller-coaster ride, but we came out shining.

BMM Initiatives was successfully launched.



Dr. Madhuri Kanitkar and Vamshi Reddy inaugurated and gave a fantastic kickstart on Thursday!! Dr. Kanitkar attending CME conference was an honor. Yuwa created a memorable experience with Shubhankar Kulkarni's candlelight concert.

Reshimgathee brought parents and young boys and girls together for a wonderful 'Melawa'.

Ekankika spardha Natyasrujan had celebrity judges: Prashant Damale, Vijay Kenkre and Ajit Bhure. 5 Ekankika teams performed live on stage during the convention for Ekankika spardha.



Kalaspandan Artist Gallery had Pramod Kurlekar (International award winner artist from India) and Suchitra Bhosale from USA, who gave our artists a platform to showcase their talent.

B-connect and Real Estate conference gave platform to IT professionals, businesses owners, real estate developers from North America and India.



Dr. Sanjay Upadhye talk show Mast Bindhast 24 Tas was highlight for 55+ Uttarrang Community.

One of my most special experiences was Baltarang & Kishorkunj. We had 99 children participate—a result of countless calls,

practices, rehearsals, coordination, and the dedication of our local program leads. A big Thank you to all Children participants. Thank you to Kailas for arranging plaques at the last minute!

A big thank you to everyone who created groups, organized practices, attended rehearsals, and brought their children together to participate on August 6th. Your time, energy, and leadership made this possible.

There is one learning I will carry forward: children's activities and All BMM Initiatives must be part of the general convention days in future conventions. Still, seeing our children perform alongside Seattle Marathi Shala , Dr. Saleel Kulkarni, Gurukul, Experiment, Swarsamvadini, Gauri Vidhvans, Gauri Agashe group, Sanket Joshi group, Aarti Lotlikar students and other talented young performers was incredibly rewarding. The vision was to bring our children together, give them a platform, build their confidence, and allow them to showcase their talent to the larger Marathi community.



Most importantly, I want to thank everyone who trusted me, believed in the vision, attended meetings, worked through budgets, planned, coordinated, solved problems, and stayed committed until the end.

BMM Initiatives was never about one person. It was about all of us. Every phone call, meeting, rehearsal, volunteer hour, and helping hand contributed to something much bigger than us.I am grateful to have shared this journey with all of you. Thank you for your trust, your time, your energy, and your heart. With gratitude and love,

- **Savita Santosh More,**
Co-Convener, BMM 2026BMM Initiatives Lead

## BMM Seattle Day 0 Feedbacks

BMM Seattle Day 0 हा एक अतिशय सुंदर आणि संस्मरणीय कार्यक्रमांनी भरलेला दिवस होता! 🌸

कार्यक्रमातील वातावरण खूप छान, उत्साहपूर्ण होते. सर्व काही अतिशय उत्तम पद्धतीने आयोजित करण्यात आले होते. मुलांचे कार्यक्रम अतिशय सुंदर आणि नियोजनबद्ध पद्धतीने सादर करण्यात आले होते. हा दिवस मुलांसाठी खास बनवण्यासाठी खूप मेहनत आणि विचार करण्यात आला होता, हे स्पष्टपणे दिसत होते.
आम्ही व मुलांनी प्रत्येक कार्यक्रमाचा मनापासून आनंद घेतला.

हा दिवस यशस्वी करण्यासाठी पडद्यामागे मेहनत घेणाऱ्या सर्वांचे खूप कौतुक आणि अभिनंदन. BMM Seattle Day 0 मुळे BMM convention ची सुरुवातच अतिशय सुंदर, उत्साहपूर्ण आणि अविस्मरणीय अशी झाली! 👏😊

- **Rupali Ghanekar Choudhary,** Seattle WA.

🌸 मनःपूर्वक आभार 🌸
सस्नेह नमस्कार BMM 2026 आयोजन समिती आणि सर्व स्वयंसेवक,

BMM 2026 Day 0 हा पालक आणि मुले आम्हा सर्वांसाठीच एक अतिशय सुंदर, उत्साही आणि संस्मरणीय अनुभव ठरला!

दीप प्रज्वलन आणि गणेश वंदनेने झालेली मंगलमय सुरुवात, त्यानंतर महाराष्ट्राची लोकधारा, भाज्यांच्या राज्यात, मधली सुट्टी, होलिका दहन, स्वरसंवादिनी आणि नाट्य सादरीकरण या सर्वच कार्यक्रमांनी मंचावर वेगळीच रंगत आणली. स्थानिक सिॲटलच्या पलीकडे जाऊन इतक्या मोठ्या राष्ट्रीय व्यासपीठावर कला सादर करण्याची संधी मुलांना मिळाली, ही त्यांच्या आत्मविश्वासासाठी खूप मोठी गोष्ट आहे. कला सादर करण्यासोबतच नवीन मित्र जोडणे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडले जाणे हा मुलांसाठी अत्यंत समृद्ध करणारा अनुभव होता.

लाईव्ह कार्यक्रमात काही तांत्रिक अडचणी येणे स्वाभाविक असते, पण तंत्रज्ञान आणि बॅकस्टेज टीमने ज्या सहजतेने आणि शांतपणे त्यावर मात करून प्रेक्षकांना उत्तम अनुभव दिला, ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

BMM 2026 ची सुरुवात Day 0 मुळे खऱ्या अर्थाने दिमाखदार आणि अविस्मरणीय झाली! हा दिवस यशस्वी करण्यासाठी पडद्यामागे अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सर्व कोऑर्डिनेटर्स, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे मनापासून अभिनंदन आणि कौतुक! 👏😊
मनःपूर्वक धन्यवाद.

**Shubhangi & Sandeep Shahane,** Seattle WA

बीएमएम २०२६ सीॲटलचा (BMM 2026 Seattle) पहिला दिवस (Day 0) अतिशय सुंदर होता. मुलांना मंचावर सादरीकरण करण्याची ही उत्तम संधी दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद. उत्तर अमेरिका (NA) एकांकिका पाहणे ही देखील एक पर्वणीच होती. युवा संगीत कार्यक्रम आणि इतर सादरीकरणे खूपच मनोरंजक होती. स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्तम आणि नेटके केले होते!

**Manasi Upasani,** Seattle WA

नमस्कार,
बीएमएम च्या डे 0 कार्यक्रमाला डे 0 ची कमिटी आणि सर्व कार्यक्रम करणाऱ्या आणि बसवणाऱ्या मंडळींनी खूपच कष्ट घेतले होते आणि कार्यक्रमही खूप छान झाले.

परंतु प्रेक्षकांच्या पर्यंत ते पोचलेच नाहीत कारण मुलांचे घरचे लोक सोडले तर फारच कमी रिस्पॉन्स होता.

अशा प्रकारचे मुलांचे कार्यक्रम करायचे असतील तर ते मुख्य अधिवेशना च्या दिवसातच ठेवले पाहिजेत.

अन्यथा इतक्या लोकांचे कष्ट आणि पैसा वाया जातो. धन्यवाद स्वरसंवादिनी. **Deepashree Joglekar,** Seattle

Day 0 activities provide a great platform for kids to perform. It provided an opportunity to speak the language they are learning and more importantly connect with their culture in a very friendly fun filled environment.Programs were organized well and having younger kids perform sooner in the day helped. Madhli Sutti program was engaging and entertaining.

**Things that could have been better are**

1. AV including mic setup could have been better. For a few dramas kids dialogues were not audible.
2. It would have been nice to have out of Seattle student performers perform at day 0. Seattle had great talent but the audience was mostly from Seattle.
3. The day was quite long for students hence quite tiring.

Overall I think students and their parents have made great memories that they will remember. Also I want to thank the efforts of all the volunteers who worked tirelessly to make this happen for the students!!! Pradnya Bhagwat, Seattle WA.

I am thrilled to have participated in the BMM convention! Initially, I was skeptical about shipping my mid-large framed painting coast-to-coast, but I couldn't resist showcasing my Marathi-themed art.Vinita Mohite and her team were incredibly organized, providing clear guidelines and prompt answers. Manjiri Kharkar was also instrumental, offering crucial support with packing and shipping that made the process seamless.Although I couldn't attend in person, the exhibition video looked exceptionally professional. Managing so many paintings is a massive feat, and kudos to Vinita, the volunteers, and eminent judges Suchitra Bhosle and Pramod Kurlekar. To wrap up a wonderful experience, winning 1st prize was the absolute cherry on top. Thank you, BMM team!

- **Medha Atre-Kulkarni.**



## बीएमएम २०२६ सिॲटल अभिप्राय

बीएमएम २०२६ ची तयारी सुरू झाली म्हणता म्हणता, हे भव्य स्नेहसंमेलन यशस्वीरित्या पारही पडले! बीएमएम २०२६ हे केवळ अधिवेशन नव्हते; तो मराठी संस्कृती, आपुलकी, मैत्री, कला आणि स्वयंसेवेचा एक भव्य उत्सव ठरला. चार दिवसांचा हा अविस्मरणीय अनुभव हजारो सहभागींच्या मनात कायमचे घर करून गेला. संमेलनानंतर आम्हाला असंख्य प्रेमळ, उत्स्फूर्त आणि मनापासूनचे अभिप्राय प्राप्त झाले. प्रत्येक शब्द आमच्या स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांपैकी काही निवडक प्रतिक्रिया आपल्या सर्वांसाठी.

Thanks to Mohit, Jayant, Subhag and all other volunteers for making the convention a huge success. It was a great experience with awesome programs, delicious food and hospitality. We all had a great time over 3.5 days starting on Day 0. Hope you all relax, feel proud of the effort put in over the last 2+ years and reflect on the journey. Best wishes. 🙏🏽

- **Mahesh Keni,** Platinum Donor, Seattle

Dear Seattle BMM organizers, I want to congratulate you and thank you for the fabulous BMM2026 you put together. The program selections were fabulous and we left Seattle wanting more. Please accept my humble thank you for helping us make these memories, Regards,

- **S. Pandhare**, Grand Rapids, MI

We just wanted to thank the Seattle team for all your efforts in making the BMM Convention such a nice experience.

- **T. Gadre Clifton,** VA

We really enjoyed the BMM convention. Everything (Programs, food, organization, arrangements, planning, accommodations, decorations) was great. All of you volunteers worked hard for 2+ years. Big Thanks to all. Both my LA guests had a great time.

**- Aparna Nadkarni,** Bronze Donor

तालश्रेष्ठ वादनोत्सव स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल विनय, पराग आणि निखिल यांचे धन्यवाद. संपूर्ण कार्यक्रम अतिशय' उत्कृष्ठ आयोजित केला होता. तुम्हा तिघांनी खूप कष्ट घेतलेत, तुमचे मनःपूर्वक अभिनंदन! आम्हाला खूप शिकता आलं, मैत्रीची नाती निर्माण झाली, दुसऱ्या पथकांचे अनुभव ऐकता आहे, त्यांचे वादन पाहता आले, खूप छान वाटले. MMM फिनिक्स आणि नादताल अटलांटा या दोनही पथकांचे वादन खूपच सुंदर झाले. अतिशय शिस्तबद्ध, जोशपूर्ण वादन बघून खूप उत्साही वाटलं. दोनही पथकांचे अभिनंदन. आपल्यापैकी कोणाचेही काही कारणाने युटाला येणे झाले तर आवश्य कळवा, नक्की भेटू. तीनही आयोजकांना पुन्हा एकदा धन्यवाद. पुन्हा भेटूच.

**स्वराज्य ढोल पथक,**
तालश्रेष्ठ वादनोत्सव स्पर्धेचे प्रथम पारितोषिक विजेते

The BMM convention was a great success. The programs were amazing esp. the opening ceremony and The Folk Akhyan musical show. The food was great. Congratulations to Mohit and the whole convention team. We all had a great time. Thanks!

- **Raj Angolkar,** Platinum Donor, Seattle

बृहन महाराष्ट्र मंडळाचे २२ वे अधिवेशन सिॲटल येथे उत्साहाने पार पडले. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिलेच अधिवेशन. साहित्य, संगीत, कला, विज्ञान, काव्य, नाट्य,नृत्य, लोकसंगीत आणि वैचारिक भाषणांनी परिपूर्ण असे हे अधिवेशन! मला सर्वात जास्त आवडले ते सिएटलमधील मराठी माणसांचा उत्साह, शिस्त आणि मराठी या ३ अक्षरांवर प्रेम करत निर्व्याज मनाने केलेली मातृभाषेची सेवा! अधिवेशन शब्द व्यवहारी असेल पण संमेलन शब्दातील एकरूपता ३ दिवस मी अनुभवली. ही अमेरिकेत स्वकर्तृत्वाने यशस्वी झालेली मराठी माणसे निगर्वी वृत्तीने अमृताला

पैजेवर जिंकणाऱ्या भाषेसाठी, तिच्या संवर्धनासाठी झटत होती. आणखी काय लिहू? जिथे मन विचार जुळतात तिथे शब्द विरतात.

- **डॉ. संजय उपाध्ये** (सुप्रसिद्ध वक्ते, प्रवचनकार)

Namaskar. I thoroughly enjoyed attending, participating and speaking at BMM Seattle 2026.

The organizing team did an impeccable job from planning stages through actual events. I was treated to extreme comfort and ease through all stages, transportation, stay, travel, food and event itself. It was a beautifully organized event and all team members were professional and kind through the entire process. Kudos, thanks and gratitude to the entire BMM Seattle 2026 team.

- **Nilesh Oak**, renowned History Researcher and BMM2026 Speaker

बीएमएम २०२६ सिॲटल अधिवेशन हा खरोखरच एक सुंदर, भव्य आणि अविस्मरणीय अनुभव होता. अमेरिकेच्या भूमीवर मराठी मातीचा सुगंध, आपली संस्कृती, परंपरा आणि मराठी अस्मिता जपत, विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा मनाला विशेष भावला. अधिवेशनासाठी निवडलेले प्रशस्त Convention Center, विविध आणि दर्जेदार कार्यक्रमांची सुंदर आखणी तसेच भोजनात रुचकर आणि मोजकेच पदार्थ ठेवण्याची उत्तम संकल्पना यामुळे संपूर्ण अनुभव अधिकच आनंददायी झाला. विशेषतः या अधिवेशनात आयोजित केलेला "स्त्रीत्वाचा सन्मान" हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी होता. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करून त्यांच्या प्रवासाला व्यासपीठ देण्याचा हा सुंदर प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. जगभरातील मराठी मनांना एकत्र आणणाऱ्या या भव्य सोहळ्यासाठी बीएमएम २०२६ च्या संपूर्ण टीमचे आणि अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार! "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी!" ❤️🙏

- **सौ. प्राजक्ता (Sara) बोंगाळे**, शिकागो
U.S. Army (बीएमएम २०२६ स्त्री सन्मान पुरस्काराच्या मानकरी)

The convention was amazing. Some of the programs I attended were exceptional -हसूबाई जोरात, वाद्यसंगम, रेडिओ मैत्री, आरती अंकलीकर, art gallery, artist interviews and live demos, The Folk Aakhyan etc. really good. The loooong planning and efforts are seen throughout. It was fun! Hope you guys get some rest now.

- **Prajakta Ghatpande**, Seattle

BMM २०२६ सिॲटल अधिवेशन खरोखर हे चार दिवसांचे हे संमेलन, एका नव्या उंचीवर होते. ५ नाटके, ५ एकांकिका, शास्त्रीय नृत्य, वाद्यवृंद, रेडिओ मैत्री आणि विठ्ठल गाणी यांसारख्या कार्यक्रमांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. आरती अंकलीकर, प्रशांत दामले, ऋषिकेश रानडे, सलील आणि शुभंकर कुलकर्णी यांच्या सादरीकरणांनी रंगत वाढवली. प्रथमच १४ कर्तृत्ववान महिलांचा स्त्रीशक्तीचा गौरव, अभिजात मराठीचा विशेष उत्सव, उत्तर अमेरिकेतील पहिली ज्युरी-आधारित कला स्पर्धा आणि प्रमुख सभागृहांना दिवंगत मराठी महिलांची नावे देऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. या अधिवेशनात प्रथमच अधिवेशनाच्या शुभंकरची (mascot) संकल्पना पुढे आली. रेनियर राणी या शुभंकराने सिएटलची ओळख आणि मराठी संस्कृती यांचा सुंदर संगम साधला. मराठी स्टँड-अप कॉमेडी, अवघा रंग एक झाला नाटक, अस्सल महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ आणि विविध प्रदर्शन स्टॉल्स यांनी अधिवेशनाची शोभा वाढवली. एकूणच बीएमएम २०२६ सिॲटल हे सांस्कृतिक, कलात्मक आणि सामाजिक अभिमानाचा अविस्मरणीय सोहळा ठरले.

- **सौ. चित्रा मेहेंदळे** , मुंबई, भारत

बीएमएम २०२६ सिॲटलचा (BMM 2026 Seattle) पहिला दिवस (Day 0) अतिशय सुंदर होता. मुलांना मंचावर सादरीकरण करण्याची ही उत्तम संधी दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद. उत्तर अमेरिका (NA) एकांकिका पाहणे ही देखील एक पर्वणीच होती. युवा संगीत कार्यक्रम आणि इतर सादरीकरणे खूपच मनोरंजक होती. स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्तम आणि नेटके केले होते!

- **एक उपस्थित**

सस्नेह नमस्कार, बीएमएम २०२६ आयोजन समिती आणि सर्व स्वयंसेवक, बीएमएम २०२६ Day 0 हा पालक आणि मुले आम्हा सर्वांसाठीच एक अतिशय सुंदर, उत्साही आणि संस्मरणीय अनुभव

ठरला! दीप प्रज्वलन आणि गणेश वंदनेने झालेली मंगलमय सुरुवात, त्यानंतर महाराष्ट्राची लोकधारा, भाज्यांच्या राज्यात, मधली सुट्टी, होलिका दहन, स्वरसंवादिनी आणि नाट्य सादरीकरण या सर्वच कार्यक्रमांनी मंचावर वेगळीच रंगत आणली. स्थानिक सिॲटलच्या पलीकडे जाऊन इतक्या मोठ्या राष्ट्रीय व्यासपीठावर कला सादर करण्याची संधी मुलांना मिळाली, ही त्यांच्या आत्मविश्वासासाठी खूप मोठी गोष्ट आहे. कला सादर करण्यासोबतच नवीन मित्र जोडणे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडले जाणे हा मुलांसाठी अत्यंत समृद्ध करणारा अनुभव होता. लाईव्ह कार्यक्रमात काही तांत्रिक अडचणी येणे स्वाभाविक असते, पण तंत्रज्ञान आणि बॅकस्टेज टीमने ज्या सहजतेने आणि शांतपणे त्यावर मात करून प्रेक्षकांना उत्तम अनुभव दिला, ते खरोखरच कौतुकास्पद आहे. बीएमएम २०२६ ची सुरुवात Day 0 मुळे खऱ्या अर्थाने दिमाखदार आणि अविस्मरणीय झाली! हा दिवस यशस्वी करण्यासाठी पडद्यामागे अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सर्व कोऑर्डिनेटर्स, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे मनापासून अभिनंदन आणि कौतुक! 👏😊 मनःपूर्वक धन्यवाद,

**- एक पालक**

संपूर्ण प्रक्रियेत उत्कृष्ट समन्वय आणि शेवटच्या दिवसापर्यंत प्रत्येक प्रश्नाला संयमाने उत्तरे दिल्याबद्दल नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा टीमचे मनःपूर्वक आभार. आता थोडी विश्रांती घ्या, लवकरच पुन्हा भेटू!"

**- टीम अभिव्यक्ती,** लॉस एंजेलिस

बीएमएम दरम्यान दिलेल्या सहकार्याबद्दल आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार. तुमच्यामुळे आमचे काम खूप सोपे झाले. नाट्यप्रेमींसाठी असे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद!

**टीम अमृत निर्मिती,** वॉशिंग्टन डी.सी.

उत्कृष्ट नियोजन, सुरळीत एकांकिका स्पर्धा आणि सुंदर व्यवस्थापनाबद्दल संपूर्ण नाट्यसृजन टीमचे आभार. तुमच्या परिश्रमामुळे हा अनुभव अविस्मरणीय ठरला!

**- बेसमेंट थिएटर,** शिकागो

Hi Parag, Sanjay and Prasanna, Our entire team is back in NJ except us, we are spending 1 week at Mt Rainier, Olympic and North Cascades. Thank you for your hospitality and hard work in making not only this but other shows possible. We also have been receiving positive feedbacks. Hope people overall liked the play. Ultimately what matters is the Tagline of BMM- जपूया संस्कृती विणूया नाती! Stay in touch.

**- Sukhi Manasacha Sadara Team,**
Abhijat Kala Mandali, New Jersy

Dear Parag, Shailesh, and Subhag, Just now landed in Raleigh. Many thanks for hosting and your help in staging this play at the convention. It was an awesome experience. Please let us know if you would be in the vicinity of Raleigh and I would love to meet up.Looking forward to staying in touch, Cheers,

**Madhav Manjrekar,**
Mahanirvan Natak team, Raleigh

संमेलनात सगळे छान झाले . मला संमेलनाचे पुस्तक 'गोफ' मिळाले, माझी रेसिपी व विनोद छापून आले आहेत , पुस्तक फारच सुंदर छापले आहे.

**- सौ. रेखा पै,** सिॲटल

It was a well organized BMM with wonderful programs, yummy food and great company of friends and family. We had a blast in those 4 days. Thanks to you and all the organizers for doing such a fabulous job. We could see the hard work you all put into, to make it a success. Hope you all are getting some well needed rest. Thanks again for all your help 🙏🏼🙏🏼

**- Platinum donor,** Seattle

BMM Swarmanch 2026 was a blast. Thanks to all the wonderful participants, hosts, and judges! ❤️ It was such a valuable experience listening to other talented singers, sharing the stage with renowned musicians, and receiving feedback from Dr. Saleel Kulkarni and Hrishikesh Ranade, truly such an

honor. Huge thanks to Sheetal Patwardhan & Amit Kulkarni for all your efforts in putting this show together! And congrats to all participants!! 🎉

- **Participant,** Swarmanch, Singing Competition

अधिवेशन अत्यंत उत्तम प्रकारे पार पडले. एवढा मोठा कार्यक्रम म्हटला की काही त्रुटी असणारच, पण मला सर्वात भावले ते म्हणजे प्रत्येक स्वयंसेवकाच्या चेहऱ्यावर कायम दिसणारे हास्य. इतका शारीरिक आणि मानसिक ताण असूनही कोणीही वैतागलेले किंवा चिडलेले दिसले नाही. प्रत्येक स्वयंसेवक उत्साहाने, हसतमुखाने मदत करत होता, विचारपूस करत होता आणि सर्वांची काळजी घेत होता.

- **एक प्रेक्षक,** डेन्व्हर

शनिवारचे ढोल-ताशा स्पर्धेचे आयोजक आणि सहभागी स्पर्धक पथकांचे ढोल-ताशा जॅमिंग वादन अत्यंत सुंदर झाले. मैत्री, एकता आणि आपल्या संस्कृतीवरील प्रेमाचे ते एक उत्तम सादरीकरण होते. आर्ट गॅलरीचा डेमो देखील अतिशय सुंदर झाला. आर्ट गॅलरीमधील चित्रे खरोखरच अप्रतिम होती. संपूर्ण संमेलन अतिशय उत्तम प्रकारे पार पडले.

- **एक कलाप्रेमी प्रेक्षक,** सिॲटल

I just wanted to congratulate your committee on an amazing musical program line up. I think all of them were a treat! Thank you

- **Deepa Galande,** Seattle

- Aditya Ranade's performance was mesmerizing that day. Each and every song from start to finish. Thanks for bringing that program to us.
- This is my best gift from BMM 2026 !!!
- Congratulations and thank you for putting local talent on the main stage as part of swarmanch !!! Thank you !!!!
- BMM Swarmanch was an absolutely unforgettable experience! The seamless coordination, constant communication, and incredible efforts by Sheetal Patwardhan and Amit Kulkarni made it truly special. With Saleelji's guidance and the support of outstanding musicians, the songs came alive beautifully. Kudos to all the co-performers for their inspiring performances!

**From many participants and the audience of Swarmanch, the singing competition.**

जपूया संस्कृती, विणूया नाती !!! 🙏🌸

- संकलक: **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम२०२६ समिती)










## बीएमएम युवा विशेष



मराठी भाषा आणि संस्कृतीची नाळ जपत अवकाशसृष्टीकडे झेपावणारी **ऋतुजा मंदार केळकर.**

अलीकडे, ऑगस्ट 6 ते 9 दरम्यान, बीएमएम 2026 अधिवेशनात अनेक तडफदार गुणी युवक - युवतींचा सन्मान करण्यात आला. त्यापैकी एक नाव विशेष लक्षात राहिले, ते म्हणजे ऋतुजा मंदार केळकर. मराठी विश्व, न्यूजर्सी ची BMM 2026 Youth Award मानकरी!

अधिवेशनात प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली नसली तरी नुकत्याच झालेल्या दूरध्वनी अस्खलित मराठी संभाषणातून तिच्या शिक्षण प्रवासाबद्दल, सांस्कृतिक जडणघडणीबद्दल, भविष्यातील ध्येयांबद्दल आणि 'बीएमएम युवां'साठीच्या विचारांबद्दल जाणून घेण्याची संधी मिळाली!

**एडिसनमधील शालेय शिक्षण ते एम्ब्री-रिडल विद्यापीठापर्यंत:** ऋतुजाने न्यू जर्सीतील एडिसन येथील जे. पी. स्टीव्हन्स हायस्कूलमधून शिक्षण पूर्ण केले. सध्या ती फ्लोरिडामधील Embry-Riddle Aeronautical University येथे Aerospace Engineering चे शिक्षण घेत आहे.

शालेय जीवनातील उपक्रमांविषयी विचारले असता ती म्हणाली,

"मी माननीय गुरु अर्चना ताई जोगळेकर कडून कथ्थक शिकले आहे. तेरा वर्षे मी कथ्थक शिकले असून माझे 'विशारद'ही पूर्ण झाले आहे."

कथ्थक साधनेबरोबरच ती हायस्कूल मध्ये Civil Air Patrol मध्ये सक्रिय होती आणि तेथे Senior Master Sergeant या पदापर्यंत पोहोचली. ती Student Council तसेच Hawks Freshman Orientation Team मध्येही सहभागी होती.

कॉलेजमध्येही तिचा उत्साह तितकाच कायम आहे. ती सध्या खालील संस्थांमध्ये कार्यरत आहे:

- Society of Asian Scientists and Engineers (Public Relations Officer)
- Indian Students Association
- Experimental Research Propulsion Laboratory (Rocketry Club)

भविष्यातही अभियांत्रिकी व संशोधनाशी निगडित विविध संघटनांमध्ये कार्य करण्याचा तिचा मानस आहे.

अभ्यास आणि विविध उपक्रमांच्या व्यस्त वेळापत्रकातही ऋतुजा स्वतःसाठी वेळ काढते.

"मला वाचनाची खूप आवड आहे. तसेच चित्रकला, हस्तकला, पेंटिंग, अशा विविध कलात्मक गोष्टी करायला आवडतात. मला 3D मॉडेलिंग आणि 3D प्रिंटिंगचीही आवड आहे."

अलीकडेच तिने एक छोटेखानी फिजेट टॉय डिझाइन करून 3D प्रिंटरवर तयार केला.

वाचनाबाबत तिची स्पष्ट पसंती आहे. "Kindle पेक्षा प्रत्यक्ष पुस्तक वाचायला मला जास्त आवडते."

**अवकाश संशोधनाची स्वप्ने:** अभियांत्रिकीच्या क्षेत्रात ऋतुजाची वाटचाल अत्यंत स्पष्ट ध्येयांसह सुरू आहे.

"मला एरोस्पेस इंडस्ट्रीमध्ये काम करायचे आहे, विशेषतः Astronautics मध्ये. म्हणजे विमानांपेक्षा रॉकेट्स, उपग्रह आणि अवकाश संशोधनाशी संबंधित क्षेत्रात."

NASA मध्ये काम करण्याची इच्छा आहे का, असे विचारले असता ती हसत म्हणाली,

"हो, मुख्यतः अवकाश क्षेत्राशी संबंधित काम करायला मला आवडेल."

सध्या ती इंटर्नशिपद्वारे व्यावहारिक अनुभवही मिळवत आहे, ज्याचा तिला भविष्यात निश्चितच फायदा होईल

**बीएमएम युवा कार्यक्रमांसाठी तिच्या सूचना:** बीएमएमच्या भावी 2028 युवा कार्यक्रमांमध्ये केवळ मनोरंजनात्मक कार्यक्रमच नव्हे तर व्यावसायिक आणि व्यावहारिक उपक्रमांचाही समावेश असावा, असे ऋतुजाचे मत आहे.

ती म्हणाली,

"विविध क्षेत्रांतील लोकांना एकत्र आणणारा मोठा नेटवर्किंग कार्यक्रम असावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणि नवोदित व्यावसायिकांना नवीन संधी आणि मार्गदर्शन मिळू शकेल."

तिला युवकांचा सक्रिय सहभाग असलेले कार्यक्रमही आवडतील.

"फक्त कार्यक्रम पाहण्याऐवजी आपणही सहभागी होऊ शकू अशा स्पर्धा किंवा उपक्रम असावेत. उदाहरणार्थ, नृत्यस्पर्धा."

**संस्कृतीशी जोडलेली ओळख:** संपूर्ण संभाषणात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे आपल्या संस्कृतीशी जोडून राहण्याबाबतची ऋतुजाची जाणीव.

ती युवा पिढीला सांगते,

"आपल्या संस्कृतीशी संबंधित किमान एक तरी उपक्रम कायम ठेवला पाहिजे. अन्यथा व्यक्तिमत्त्वात काहीतरी कमी असल्यासारखे वाटते."

कॉलेजमध्ये विविध देशांतील आणि संस्कृतींतील विद्यार्थ्यांना भेटताना हा अनुभव अधिक समृद्ध होत असल्याचे ती सांगते.

"प्रत्येकजण आपल्या संस्कृतीबद्दल बोलतो तेव्हा काही ना काही नवीन शिकायला मिळते. तसेच आपल्या संस्कृतीबद्दल इतरांना सांगताना खूप छान वाटते."

**कथ्थकची सांस्कृतिक दूत:** कथ्थक हा ऋतुजाच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. नवीन मित्रमैत्रिणींशी बोलताना ती भारतीय शास्त्रीय नृत्यपरंपरेबद्दल माहिती देत असते.

"अनेकांना भारतात एकूण आठ वेगवेगळ्या शास्त्रीय नृत्यशैली आहेत हेच माहीत नसते."

ती पुढे सांगते,

"भारतीय शास्त्रीय नृत्य म्हटले की बहुतेक जण भरतनाट्यमच समजतात. पण कथ्थक, कुचिपुडी, ओडिसी अशा अनेक शैली आहेत."

कथ्थक मधील घराण्यांची परंपरा समजावून सांगताना लोकांना विशेष रस वाटतो.

"जेव्हा आपण घराण्यांची परंपरा, गुरू-शिष्य संबंध याविषयी सांगतो, तेव्हा लोकांना ते खूप रोचक वाटते."

गुरु अर्चनाताई जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ऋतुजाने लखनौ, जयपूर आणि बनारस या तिन्ही घराण्यांतील घटकांचा अभ्यास केला आहे.

**शिकताना शिकवण्याचाही अनुभव:** हायस्कूलमध्ये असताना ऋतुजाने अनेक कथ्थक वर्ग घेतले तसेच आता ऑनलाईन वर्ग घेत आहे, त्या अनुभवाबद्दल ती म्हणाली,

"जेव्हा आपण इतरांना शिकवतो, तेव्हा त्या विषयाची आपली स्वतःची समज आणखी वाढते."

शिकण्याबरोबरच ज्ञान इतरांपर्यंत पोहोचवण्याची तिची ही वृत्ती विशेष कौतुकास्पद आहे!

**पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

ऋतुजाशी झालेल्या या संवादानंतर तिच्या व्यक्तिमत्त्वातील दोन गोष्टी विशेष ठळकपणे जाणवतात: महत्त्वाकांक्षा आणि सांस्कृतिक जडणघडण. मराठी बोली भाषा,लिहण्या आणि वाचण्याचे सर्व धडे आणि बाळकडू तिला घरीच, आजी , आई आणि बाबा कडून लाभले आहे.

एका बाजूला ती अवकाश संशोधन क्षेत्रात मोठी भरारी घेण्याचे स्वप्न पाहते, तर दुसऱ्या बाजूला कथ्थक, मराठी संस्कृतीशी आणि मराठी भाषेशी तिची नाळ घट्ट जोडलेली आहे.

तिचा संदेशही तितकाच अर्थपूर्ण आहे:

"आपल्याला आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवणारी एखादी गोष्ट आयुष्यात नक्की असावी!."

रॉकेट्स आणि उपग्रहांच्या जगाकडे झेपावत असलेली ही तरुणी भविष्यात मोठी कामगिरी करेल, याबद्दल शंका नाही. बीएमएम युवा पिढीसाठी ती निश्चितच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे!

- **संवाद व संकलन : अश्विनी चौथाई,** एडिसन, न्यूजर्सी



# अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



कमी वयातच संस्कृती, शिक्षण, नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समतोल साधणारी **शलाका डोळस** ही प्रेरणादायी तरुणी आहे. महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषा दूत म्हणून गौरव, BMM शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी यामुळे तिचा प्रवास विशेष ठरतो. मराठी, इंग्रजी आणि फ्रेंच या तीन भाषांवरील प्रभुत्व, AP Scholar म्हणून मिळालेली ओळख, National Honor Society चे सदस्यत्व, French Honor Society मधील नेतृत्वाची जबाबदारी आणि राष्ट्रीय Le Grand Concours फ्रेंच स्पर्धेत सलग तीन वर्षे मिळवलेली सुवर्णपदके यामुळे तिच्या यशाची व्याप्ती अधिक अधोरेखित होते. मराठी वारशाशी घट्ट नाळ जपत शिक्षण, नेतृत्व आणि संस्कृतीला समान प्राधान्य देणाऱ्या शलाकाच्या यशामागची प्रेरणा, विचारांची दिशा, संस्कृतीशी असलेले नाते आणि भविष्यातील स्वप्ने जाणून घेऊ या, या विशेष संवादातून...

**तुझ्या बद्दल आम्हाला सांगशील कां ?**

माझे नाव "**शलाका डोळस**" असून मी क्युपर्टिनो, कॅलिफोर्निया येथे राहते आणि Lynbrook High School मध्ये बारावीत शिकत आहे. मला STEM विषयांमध्ये, गणित आणि Computer Science मध्ये विशेष रस आहे. त्याचबरोबर Performing Arts, अभिनय आणि संगीत हे ही माझ्या आयुष्याचे अविभाज्य भाग आहेत. मी गेली ११ वर्षे पियानो शिकत असून, गेली ८ वर्षे श्री. आदित्य रानडे यांच्याकडून हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेत आहे. २०२२ च्या BMM Convention मध्ये एकपात्री प्रयोग, २०२४ च्या Convention मध्ये Opening Ceremony आणि २०२६ च्या BMM Convention मध्ये मला "अवघा रंग एकचि झाला" या संगीत नाटकामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. अभिनय, संगीत आणि रंगभूमीवरील माझी आवड व्यक्त करण्याची ही माझ्यासाठी एक अविस्मरणीय आणि अभिमानास्पद संधी होती.

**तुझा कला प्रवास कसा सुरु झाला ?**

माझी संगीत आणि अभिनयाची आवड खरं तर मराठी मंडळापासूनच सुरू झाली. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी, मराठी शाळेत असताना गणपतीच्या कार्यक्रमात माझ्या आत्याने लिहीलेल्या "वैतागलेली पारू" या नाट्यछटेत मी अभिनय केला. तिथूनच माझ्या कलाप्रवासाची सुरुवात झाली.

शाळेत असताना मी नियमितपणे विविध कार्यक्रमांमध्ये स्टेजवर सादरीकरण करत असे. माझा अभिनय आणि स्टेजवरील आत्मविश्वास पाहून शिक्षकांनी मला अभिनयाच्या क्षेत्रात पुढे जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन (कला) च्या माध्यमातून इंग्रजी नाटकात काम करण्याची संधी मिळाली. दरम्यान, "वारी पंढरीची" या कार्यक्रमाच्या निमित्ताने आमची रानडे कुटुंबाशी ओळख झाली. पुढे आदित्य रानडे यांनी गाण्याचे वर्ग सुरू केले आणि मी त्यांच्याकडे गाणे शिकायला सुरु केले. गाणे शिकत असतानाच मला विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. या स्पर्धांमध्ये मला अनेक पुरस्कारही मिळाले. या संपूर्ण प्रवासात मिळालेला अनुभव, प्रोत्साहन आणि मिळालेले यश यामुळे अभिनयाविषयीची माझी आवड अधिकाधिक वाढत गेली आणि हीच आवड पुढे माझ्या कलेच्या प्रवासाची प्रेरणा बनली.

उत्तर अमेरिका आणि भारतातील प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये मी सर्वोच्च मानांकने आणि सन्मान मिळवले आहेत, ज्यामध्ये पुढील स्पर्धांचा समावेश आहे:

- First Place, Balgandharva Smruti Natyageet Competition, India
- First Place, Chaitradhun Hindustani Classical Vocal Competition
- First Place, Chaitradhun Marathi Semi-Classical Vocal Competition
- First Place, Basant Bahar Vocal Competition
- Multiple additional awards in national and international music competitions

**तुझ्या "मराठी भाषा दूत" ह्या सन्मानाबद्दल सांगशील कां ?**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत 'मराठी भाषा दूत'

ही ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धकांना ‘अभिजात मराठी – माझ्या अपेक्षा’ या विषयावर तीन मिनिटांचे भाषण सादर करायचे होते.

मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार-प्रसार आणि जागतिक स्तरावर तिची ओळख अधिक दृढ करण्यासाठी आपण काय योगदान देऊ शकतो, तसेच अभिजात मराठी भाषेकडून आपल्या काय अपेक्षा आहेत, या विषयावर देश-विदेशातील अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यामध्ये निवड होऊन मला ‘मराठी भाषा दूत’ म्हणून गौरविण्यात आले आणि महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. ‘मराठी भाषा दूत’ ही केवळ एक पदवी किंवा सन्मान नसून मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराची आणि संवर्धनाची जबाबदारी आहे, असे मी मानते. ‘मराठी भाषा दूत’ म्हणून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे.

**“Official Proclamation from the Mayor of the City of Cupertino” बद्दल पण सांगशील का?**

माझ्या आयुष्यातील सर्वात अर्थपूर्ण अनुभवांपैकी एक म्हणजे शाळेतील तसेच शाळेबाहेरील विद्यार्थ्यांना गणित, लेखन आणि जीवशास्त्र या विषयांमध्ये मार्गदर्शन करणे. विशेषतः एका फॉस्टर युथ विद्यार्थिनीला तिचे काही वर्ग चुकल्यामुळे गणित विषयात अडचणी येत होत्या. महाविद्यालयीन शिक्षणासाठी आवश्यक असलेला Algebra II विषय पूर्ण करणे तिच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. माझ्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि वैयक्तिक शिकवणीमुळे तिच्या शैक्षणिक कामगिरीत लक्षणीय सुधारणा झाली आणि तिने आवश्यक शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने यशस्वी प्रगती केली. या शैक्षणिक सेवेसाठी आणि समुदायातील योगदानाच्या गौरवार्थ मला क्युपर्टिनो शहराच्या महापौरांकडून अधिकृत प्रशस्तीपत्र (Official Proclamation) प्राप्त झाले. हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण असून, शैक्षणिक मदत, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि समाजसेवेच्या माध्यमातून इतरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची माझी बांधिलकी आणखी दृढ करणारा आहे.

**तुझा दिवस साधारण कसा असतो? म्हणजे सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तू काय काय करतेस ?**

शाळा सुरू झाल्यानंतर, माझा दिवस सकाळी ७ वाजता सुरू होतो. मी सायकलने शाळेत जाते आणि वर्ग सकाळी ८:३० वाजता सुरू होतात. शाळा साधारणपणे दुपारी ४ वाजेपर्यंत असते. काही दिवशी मी शाळेतच tutoring करते. घरी परतल्यानंतर जेवण करून संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत अभ्यास व गायनाचा रियाज करते. सोमवारी संगीत, मंगळवारी पियानो आणि बुधवारी संगीताशी संबंधित उपक्रम असतात. गुरुवार आणि शुक्रवार गृहपाठ व अभ्यासासाठी असतात. मोकळ्या वेळेत मला वाचन आणि संगीताचा रियाज करायला आवडतो.

भविष्यात मला संगणक विज्ञान व AI क्षेत्रात काम करून भारतीय शास्त्रीय संगीतावर संशोधन करायचे आहे. गायनातील स्वर, लय, संगीतशैली आणि विविध संगीत-पॅटर्न ओळखून गायकांना सराव व सुधारणा करण्यास मदत करणारे AI-आधारित मॉडेल विकसित करण्याची माझी इच्छा आहे.

**तुला बाकीच्यांना, विशेषतः तरुण वाचकांना, काय सांगावेसे वाटते?**

मी एवढेच सांगेन की, शाळेत जाणे आणि शिक्षण घेणे आवश्यक आहे. पण त्यासोबतच एखादी गोष्ट निवडा आणि तिला तुमची आवड, तुमची पॅशन बनवण्यासाठी पूर्ण मनापासून प्रयत्न करा. त्यासाठी सातत्याने मेहनत घेत राहा, हळूहळू तुम्हाला त्या गोष्टीत आनंद मिळू लागेल. जर एखादी गोष्ट आवडली नाही, तर दुसरी गोष्ट करून पाहायला अजिबात संकोच करू नका. मन खुले ठेवा, वेगवेगळ्या गोष्टींचा अनुभव घ्या आणि स्वतःला काय आवडते ते शोधत राहा.

शेवटी, BMM शिष्यवृत्तीसाठी माझी निवड करून मला दिलेल्या या सन्मानाबद्दल मी BMM चे मनःपूर्वक आभार मानते. आपल्या समाजाकडून मिळालेली ही कौतुकाची आणि सन्मानाची पावती माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.

\- **शब्दांकन:** **उत्तरा भालेराव**, टँपा, फ्लोरिडा



**परदेशातील विद्यार्थ्यांची मराठी भाषेला पसंती**

पुणे, ता. १८ : बृहन्महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका यांच्यातर्फे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता पहिली ते आठवीच्या मराठी भाषा विषयाच्या मूल्यमापनासाठी अमेरिका, डेन्मार्क, कॅनडा देशांतून विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. तिचा निकाल मंगळवारी ऑनलाइन जाहीर झाला. यावर्षी एकूण ६० मराठी शाळा केंद्रांमधून पहिली ते आठवीचे २२० विद्यार्थी महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत परीक्षेसाठी प्रवेशित झाले होते.

अनिवासी भारतीय मराठी पालकांच्या मुलांना मराठी भाषा शिकता यावी, यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका, राज्याचा शिक्षण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार बृहन्महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या कॅनडा, डेन्मार्क, अमेरिकेतील शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनी बालभारतीद्वारे प्रकाशित मराठी भाषा विषयांच्या पुस्तकांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर विद्यार्थ्यांची १७ मे रोजी संकलित मूल्यमापन परीक्षा घेण्यात आली. त्याचा निकाल जाहीर करण्यात आला.

**महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सकाळने BMM Marathi Shala आणि बालभारती परीक्षेच्या यशाची दखल घेतली आहे. अमेरिका, कॅनडा, डेन्मार्क आणि नॉर्वे येथील २२० विद्यार्थी उत्तीर्ण! विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार! परदेशात मराठीचा झेंडा असाच उंच फडकत राहो!**

Organized by

BRIHAN MAHARASHTRA MANDAL
NORTH AMERICA (USA/CANADA)

# YUWA CONNECT - BMM YUWA YOUTH MENTOR PROGRAM

The Yuwa Connect: From Deep Maharashtra Roots to Elite North American Campuses.

BMM Yuva is seeking talented undergraduate and master's students to mentor high school youth. You will guide students through the college application process.

**CORE ENGINEERING:**
Electrical / Mechanical / Civil / Aerospace / Material Science

**HEALTHCARE:**
Medicine / Nursing / Physical Therapy / Public Health

**SOFTWARE & TECH:** Computer Science / Data Science / Cybersecurity / Product Management

**ENTREPRENEURSHIP & INNOVATION:**
Finance / Legal / Marketing / Business Strategy / Startups

**PERFORMING & VISUAL ARTS:**
Music / Film / Graphic Design / Fine Arts

**EXPECTATIONS** (Mentor Role)
- ☑ Guidance to Mentees
- ☑ Advice on Careers
- ☑ Communication with Mentee

**WHY JOIN US** (Mentor Benefits)
- ☑ Networking Opportunities
- ☑ Personal Growth to Leader
- ☑ Recognition in Community

Please scan the QR code and share your academic and extracurruritor credentiais with us. We will get back tu you.

Note: These sessions will be conducted over Zoom.

Email - yuwa@bmmonline.org

https://bmmonline.org/yuwa/

"Empowering the next generation of Marathi leaders in North America"

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



शालेय जीवनापासून पिस्तूल नेमबाजीची आवड जोपासणाऱ्या **अंकिताने** अल्पावधीतच राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांत १५ सुवर्ण, ६ रौप्य आणि ४ कांस्य पदके जिंकत तिने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातील तिची जिद्द, शिस्त आणि सातत्य प्रेरणादायी आहे.

तसेच, २०२६ ची प्रतिष्ठेची BMM यूथ स्कॉलरशिप मिळवून अमेरिका व कॅनडातील ६८ मराठी मंडळांमधून निवड होण्याचा मान तिने पटकावला असून, तिच्या कर्तृत्वाची आंतरराष्ट्रीय स्तरावरही दखल घेण्यात आली आहे.

**तुझ्या बद्दल आम्हाला सांगशील का ?**

मी अंकिता अमोल देवकुळे, लुट्झ, फ्लोरिडा येथे राहते. सध्या मी The Ohio State University मध्ये बायोकेमिस्ट्री (ऑनर्स)च्या दुसऱ्या वर्षात प्री-मेडिकल ट्रॅकवर शिक्षण घेत आहे. पिस्तूल नेमबाजीतील कामगिरीमुळे मला Ohio State University कडून त्यांच्या NCAA Division1 ॲथलेटिक टीम मध्ये प्रवेश मिळाला आहे. अभ्यासाबरोबरच मला संगीताचीही आवड असून मी ७ वर्षे व्हायोलिन शिकले आहे. तसेच पियानो आणि गिटार वाजवण्याचीही आवड आहे. मी Steinbrenner High School (2021–2025) मधून ५८५ विद्यार्थ्यांच्या वर्गात १५वा क्रमांक मिळवत पदवी प्राप्त केली. शालेय शिक्षणादरम्यान ७ वर्षे ऑर्केस्ट्रामध्ये सहभाग, Hillsborough All County Orchestra तसेच सोलो परफॉर्मन्समध्ये सहभाग घेतला. याशिवाय १२ AP आणि ११ Dual Enrollment अभ्यासक्रम पूर्ण करून AP Capstone Diploma मिळवला.

**तुला पिस्तूल नेमबाजीची आवड कशी निर्माण झाली, हा खेळ तुला कां निवडावासा वाटला?**

खरं सांगायचं तर, पिस्तूल शूटिंग हा एक खेळ आहे, हे मला आधी माहीत नव्हतं. माझे वडील एअर रायफल शूटिंगमध्ये राष्ट्रीय स्तरावर खेळले होते. कोविडच्या काळात त्यांनी पुन्हा शूटिंग सुरू केलं आणि मला व माझ्या बहिणीला, अंजलीला, रेंजवर नेलं. पहिल्याच प्रयत्नात मला हा खेळ आवडला आणि २०२१ पासून माझा पिस्तूल शूटिंगचा प्रवास सुरू झाला.

**तुझा सराव कसा असतो तसेच Training Session कसे असते?**

माझ्या पहिल्या प्रशिक्षण सत्रात नेमबाजीची मूलभूत तत्त्वे, रेंजवरील सुरक्षा नियम आणि 10 मीटर पिस्तूल प्रकाराची ओळख झाली. विद्यापीठातील प्रशिक्षण शिस्तबद्ध असून सोमवार ते शुक्रवार दररोज 3 तास सराव आणि आठवड्यातून 2–3 वेळा जिममध्ये ताकद व तंदुरुस्तीवर भर दिला जातो. श्वास व मानसिक नियंत्रणाचाही नियमित सराव केला जातो. याशिवाय, वेळ मिळेल तेव्हा मी आठवड्याला 5–10 तास अतिरिक्त सराव करून माझे कौशल्य अधिक विकसित करण्याचा प्रयत्न करते.

**स्पर्धात्मक पिस्तूल नेमबाजमध्ये कोणती कौशल्ये सर्वात महत्त्वाची असतात , तुझी पहिली स्पर्धा कशी होती आणि स्पर्धेचे स्वरुप कसे असते?**

नक्कीच, एकाग्रता खूप महत्त्वाची असते. स्पर्धेच्या ठिकाणी अनेक स्पर्धक, रेंज ऑफिसर्स, कोचेस आणि प्रेक्षक असतात. आजूबाजूला अनेक प्रकारचे विचलित करणारे घटक असतात. अशा परिस्थितीत एखादा शॉट अपेक्षेप्रमाणे गेला नाही, तरी स्वतःचे लक्ष विचलित होऊ न देता, "पुढचा शॉट अजून बाकी आहे," असे स्वतःला सांगत पुन्हा पूर्ण एकाग्रतेने खेळावे लागते.

नेमबाजी सुरू केल्यानंतर आठ महिन्यात डिसेंबर 2021 मध्ये मी Winter Airgun या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले. त्या स्पर्धेत नियम अतिशय कडक होते, त्यामुळे मला स्पर्धेतील शिस्त आणि नियमांची चांगली ओळख झाली. सरावाच्या तुलनेत माझी कामगिरी अधिक चांगली झाली आणि १५ वर्षांखालील गटात मी सुवर्णपदक जिंकले.

मी दोन प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेते:

1. **10 मिटर Air pistol स्पर्धा**- या स्पर्धेत एकूण 600 गुणांसाठी 60 शॉट्स, 75 मिनिटात पूर्ण करावे लागतात. त्यानंतर सर्वोत्तम 8 स्पर्धक अंतिम फेरीसाठी जातात. अंतिम फेरीत एकूण 24 शॉट्स मारावे लागतात. हे सगळे सिंगल शॉट्स असतात, प्रत्येक शॉट्स नंतर परत पिस्तूल भरुन नेम धरावा लागतो. त्यात साधारणत: १० ते १५ सेकंद जाऊ शकतात. १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत १० गुणांच्या

वर्तुळाचा व्यास केवळ ११.५ मिमी असतो. सुमारे ३३ फूट अंतरावरून इतक्या लहान लक्ष्यावर सातत्याने अचूक नेम साधण्यासाठी अत्यंत स्थिरता, एकाग्रता आणि उत्कृष्ट नियंत्रण आवश्यक असते.

2. **25 मीटर स्पोर्ट्स पिस्तूल स्पर्धा** - Precision आणि Rapid या दोन टप्प्यात होते. प्रिसिजन टप्प्यात 30 शॉट्स संथ आणि अचूक पद्धतीने मारावे लागतात. प्रत्येक शॉटसाठी सरासरी ॲव्हरेज 50 सेकंद लागतात. या टप्प्यात 10 गुणांच्या वर्तुळाचा व्यास 50 mm असतो आणि हे लक्ष्य सुमारे 82 फूट अंतरावरून अचूक नेमबाजी करून भेदायचे असते. रॅपिड या दुसऱ्या टप्प्यात 30 शॉट्स जलद गतीने मारायचे असतात. त्यामध्ये 10 गुणाच्या वर्तुळाचा व्यास 100 mm असतो.



**या खेळातल्या अडचणीं तु कश्या हाताळल्या , आतापर्यंतची तुझी सर्वात मोठी कामगिरी कोणती आहे?**

माझ्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत (दक्षिण कोरिया) विशाल मंच पाहून क्षणभर दडपण आले, पण शांत राहून सरावावर विश्वास ठेवला. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा अभिमान वाटला. महाविद्यालयातील माझ्या पहिल्या वर्षादरम्यान, मी NCAA विजेती झाले, २०२६ मध्ये अमेरिकेच्या संघात निवड होऊन म्युनिक येथे झालेल्या Open World Cup मध्ये खेळण्याची संधी मिळाली. जगातील सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करणे हा माझ्या आयुष्यातील अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय अनुभव ठरला.

**तुझ्या शिक्षकांना आणि मित्रांना तुझ्या खेळाबद्दल काय वाटते?**

सुरुवातीला काही संमिश्र प्रतिक्रिया आल्या, पण त्या समजावून सांगितल्यानंतर सर्वांचा प्रतिसाद सकारात्मक होता. हायस्कूल आणि कॉलेजमधील शिक्षकांनी नेहमीच मला सहकार्य केले. स्पर्धांमुळे अनुपस्थित राहावे लागल्यास त्यांनी अभ्यास, असाइनमेंट आणि उपस्थितीबाबत आवश्यक सवलती दिल्या. त्यामुळे मला शिक्षण आणि स्पर्धा या दोन्ही गोष्टी प्रभावीपणे सांभाळता आल्या.

**तुला शाळेतले कोणते विषय आवडतात?**

मला विज्ञान आणि गणित विषय आवडतात. गणितात विशेषतः कॅल्क्युलस आवडते आणि मी नुकतेच कॅल्क्युलस ३ पूर्ण केले आहे. तसेच, मी माझ्या महाविद्यालयीन शिक्षणाची सुरुवात बायोकेमिस्ट्री विषयातून केली आहे.

**तुझ्या प्रगतीत कोणत्या कोचने मोठा बदल घडवला आहे का?**

माझे पहिले प्रशिक्षक माझे वडील, **अमोल देवकुळे** (Certified प्रशिक्षक) होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या नेमबाजीचा भक्कम पाया रचला गेला. त्यानंतर बॉब ग्राइम्स यांनी रेंज फॅसिलिटी आणि इलेक्ट्रॉनिक टार्गेट्सचा प्रभावी वापर शिकवला. सध्या महाविद्यालयात एमिल मिलेव यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्या मानसिक व शारीरिक तयारीत मोठी सुधारणा झाली आहे. सहा वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या आणि १९९६ अटलांटा ऑलिम्पिकचे रौप्यपदक विजेते एमिल मिलेव यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**स्पर्धात्मक पिस्तूल शूटिंगमधून तुम्ही सुरक्षितता आणि जबाबदारीबद्दल काय शिकलात?**

पिस्तूल स्पर्धा आंतरराष्ट्रीय शूटिंग स्पोर्ट फेडरेशन(ISSF) च्या सुरक्षा व तांत्रिक नियमांनुसार घेतल्या जातात. पिस्तूल नेहमी लक्ष्याच्या दिशेने ठेवावे, वापरात नसताना बोअर इंडिकेटर (सेफ्टी फ्लॅग) लावावा आणि नेम धरण्यापूर्वी ट्रिगरवर बोट ठेवू नये.

**तुझे भविष्यात काय करायचा विचार आहे ?**

मला डॉक्टर व्हायचे आहे. स्पोर्ट्समधे आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये टीम यूएसएचे प्रतिनिधित्व करत राहणे, महाविद्यालयीन नेमबाजीच्या सर्वोच्च स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणे आणि अखेरीस २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळवणे.

**तुला बाकीच्यांना काय सांगावेसे वाटते ?**

तुम्ही जे काही कराल त्याच्या शिस्तीचे पालन करा, त्याच्या तपशीलांवर लक्ष केंद्रित ठेवा. दररोजच्या सरावातून शिकण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा सुधारण्यासाठी उपयोग करा. चिकाटी, वेळेचे व्यवस्थापन आणि जरी अपयश आले तरी पुढील संधी शोधून ती तुम्हाला यशाकडे घेऊन जाईल.

- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा

## यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः

**प्रथमेश:** बाबा, तुम्हाला पण तेच वाटते आहे का?

**बाबा:** प्रथमेश, तू मला हा प्रश्न वडील म्हणून का ट्रस्टी म्हणून विचारतो आहेस?

**प्रथमेश:** How does it matter, बाबा? तुम्ही एकच आहात.

**बाबा:** मी एक व्यक्ती असलो, तरी सल्ला वडील म्हणून किंवा ट्रस्टी म्हणून दिला, तर त्यात भेद आहे. दोन्ही जागी मी उभा राहून पाहिले. तुझा निर्णय एका ठिकाणी मान्य, तर दुसऱ्या ठिकाणी अमान्य झाला म्हणून विचारले.

प्रथमेशने थोडा वेळ हातातले पेन गोल फिरवले. ऑफिसच्या खुर्चीतून उठला आणि येरझाऱ्या घालू लागला. शारदा एक मोठा फाईलचा गठ्ठा ट्रॉलीवर ढकलत आत घेऊन आली. प्रथमेश त्याच्या कॅबिनच्या खिडकीतून बाहेर बघत उभा होता. शारदा त्याच्या समीप जाऊन उभी राहिली.

प्रथमेशला तिची चाहूल लागली असावी. तो मागे वळला. काही काळ तिच्या चेहऱ्याकडे बघत बसला. एक सुस्कारा सोडला, तिचा हात हातात घेतला आणि तिच्या भाळावर डोकं टेकले.

**प्रथमेश:** I am stuck. I don't think I can get out of this one. तू पण चिडली आहेस का माझ्या निर्णयावर?

**शारदा:** प्रथमेश, तुम्ही तुमचा निर्णय मागे पण घेऊ शकता. अजून वेळ गेली नाही.

**प्रथमेश:** अगं, बोर्डासमोर माघार पत्करली, तर ते कायम मला या प्रकारे वेठीस धरतील.

**शारदा:** I understand your standpoint. I am with you. Whatever your final decision, I will stand in support of you. तुम्ही मला समजवा, तुम्हाला का वाटले की एक लॉस-मेकिंग venture चालू ठेवावे?

**प्रथमेश:** माझे काय चुकते आहे तेच मला कळत नाही. कोणी मला मीटिंगमध्ये “का नाही?” चे उत्तर देऊ शकले नाही. नुसतं प्रॉफिट-लॉसवर अडकले होते.

प्रथमेश डोळे चोळत वळला. तेवढ्यात ऑफिसच्या दारावर टकटक ऐकू आली. शारदाने जाऊन दार उघडले. समोर समोसा आणि कचोरी घेऊन मयुरेश उभा होता.

बाबा पेपर वाचण्याचे व्यर्थ प्रयत्न करत बसले होते. चहा आणि समोसे समोर आले आणि त्यांनी ते सोंग त्यागले.

**बाबा:** मयुरेश, हे काम तू एकदम मस्त केलेस. आता चाय पे चर्चा विथ समोसा आणि कचोरी करता येईल.

**मयुरेश:** बाबा, आज मी घरी लवकर आलो, तर आई म्हणाली, बाबांना उशीर झाला दिसतोय. तू त्यांना चहा घेऊन जा. मी विचार केला, चहा तर आहे, मग कुछ अच्छा हो जाए... दादा, अरे काय रे—एकदम थकलेला दिसतोय. All okay?

प्रथमेशने बोर्डाच्या मीटिंगमध्ये घडलेला प्रकार विस्तृतपणे सांगितला. मयुरेशने दोन समोसे आणि चहा संपवत सर्व प्रकार ऐकला.

**मयुरेश:** अरे, एवढंच ना? त्यात काय! हा गुंता सहज सोडवता येईल.

“माया लेके आए मछिन्दर, झोली में युग, भस्म, अम्बर।
रूद्र माला, वैराग्य छाया, भोग-मोक्ष का भेद दिखाया।”
बरोबर ना, बाबा?

बाबा चष्मा काढून कागदावर काहीतरी लिहीत बसले होते. त्यांनी तो कागद प्रथमेशकडे सरकवला.

**प्रथमेश:** यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः

बाबा, ही तर रामरक्षा. रामनाम कंठी धारण केले, तर सर्व कार्य सिद्धीस नेता येतात. मी ते कसे धारण करू? आणि मग प्रत्येक वेळी माझा विजय निश्चित हे कसे शक्य करायचे? तुम्ही दोघे कोणत्या दिशेने विचार करता आहात? मला का ती दिशा दिसत नाही?

**बाबा:** मयुरेश, तू पहिले तुझी युक्ती समजाव, मग मी पुढे नेतो.

**मयुरेश:** दादा, अरे, माया आहे सगळी. बोर्डचे काम सरळ आहे. तू पटरीवरून उतरत असल्यास तुला धरून ठेवायचे. ते तुझ्या विरोधात नाहीत. तुझं कंपनीचे मार्गदर्शन चुकते आहे किंवा या मार्गाने पुढे गेलास, तर चुकेल अशी शंका आहे त्यांना. म्हणून तुला धरून ठेवले आहे.

इतके वेगवेगळे निर्णय तू पूर्वी घेतले आहेस. त्यांनी नेहमी तुला साथ दिली. मग आता आडकाठी घातली, याचा अर्थ हा मार्ग नको. दुसरा मार्ग शोध.

स्वामींचा पुकारा आहे—अलख निरंजन. त्यांच्या झोळीत युग म्हणजे काळ (Time), भस्म म्हणजे जे जुने किंवा ज्याचा उपयोग नाही, असे जाळून राख करणे आणि अंबर म्हणजे expanse.

Simply put—जेव्हा तुला अल्प काळात काही पुढे गतिमान करायचे असेल, तेव्हा प्रथम जुने, उपयोग नसलेले काढून टाकले पाहिजे. तू lightweight होतोस आणि तुला गाडा वेगवान नेता येतो पुढे.

**प्रथमेश:** ते मला ही मान्य आहे. ज्याची गरज नाही, ते का ठेवून पसारा वाढवायचा? पण मी जर मोल्डिंग सेक्शन बंद केले, तर सगळे मोल्डिंगचे काम बाहेरून करून घ्यावे लागणार आहे. पैसे तर तिथेही मोजावे लागणार आहेत. मग सगळा खटाटोप करायचा आणि शेवटी मला दुसऱ्यावर अवलंबून राहायला लागणार, ते वेगळे.

**मयुरेश:** रुद्र—मला कठीण अंगीकारता आले पाहिजे. वैराग्य छाया—वैराग्याची सावली—म्हणजे जेवढी काळाची गरज, तेवढाच विसावा.

हे केले, तर भोग—मला हवं आहे—आणि मोक्ष—म्हणजे मला हवं नाही, तर याची गरज आहे—यातील भेद समजतो.

बाबांना वाचण्यासाठी चष्मा लागतो. गरज आहे, इच्छा नाही. एक पुरतो. एका वेळी एकच घालतात. पण एक-दोन अडचण होऊ नये म्हणून घेणे आणि उगाच आवडला म्हणून चष्मा घेत राहणे यात फरक आहे. नको ते धरून ठेवले की ओढाताण होते सगळ्यांची.

तुला जे critical आहे, ते मोल्डिंग इन-हाऊस ठेऊन बाकी बाहेर दिले तर? तिथल्या लोकांना वेगळ्या डिपार्टमेंटमध्ये घे. ट्रेन करून ते पण पुढे जातील. बाबा, बरोबर ना?

**बाबा:** हा दृष्टिकोन पण उत्तम आहे. प्रथमेश, तुला याची जास्त मान्यता दिसते आहे. या दिशेने विचार करणे पण काही चुकीचे नाही. तुला पूर्ण डिपार्टमेंट बंद न करता त्यात फेरबदल करून नुकसान कमी करता येईल.

**प्रथमेश:** बाबा, तुमचा वेगळा दृष्टिकोन आहे का याहून?

**बाबा:** मी तुला एक विचारधारा देतो. तू ती कशी वाढवायची ते ठरव. "यः कण्ठे धारयेत्तस्य"—अर्थात, कंठात धारण करता आले तर... खरं तर तुला तुझ्या तोंडातला घास घशात धरून ठेवता येत नाही. पण मग विचार करण्यासारखी गोष्ट आहे की काय धारण करता येते कंठात?

तिथे रामनाम धारण करता येते. महादेवांनी हलाहल कंठात ठेवले, कारण रामनामाची मर्यादा कोणीही ओलांडू शकत नाही.

कंठात विशुद्ध चक्र प्रसरण करत असते. वि-शुद्ध—शुद्ध अर्थात निरंजन—pure किंवा spotless म्हणू शकतोस. हे चक्र नियंत्रण चक्र आहे. तुला तुझे वचन, वर्तन, विचार सर्व काही नियंत्रित ठेवता आले, तर या चक्राचा प्रभाव डोळ्यांना दिसून येतो.

**प्रथमेश:** मला कळले नाही, बाबा. अजून खुलासा द्या.

**बाबा:** आज बोर्डाच्या मीटिंगमध्ये तू आडमुठेपणा केलास. तुला समंजसपणे वागणे सहज शक्य आहे, ते पण आज तुझ्यात गायब होते.

आम्ही सगळे जर तुला थांबवतो आहोत, तर तुला पण विचारता आले पाहिजे की, "मला तुमचे मत या क्षणाला मान्य होत नाही. कदाचित मला यावर थोडा विचार करण्यास वेळ हवा."

हे जर तू बोलला असतास, तर आम्ही तुला वेळ दिला असता. कंपनीचा कोणताही मोठा निर्णय एका क्षणात घ्यावा, ही अपेक्षा नाही.

जर मर्यादा लावल्या, तर काम सिद्धीस नेता येते. तू तुझ्या घोड्यावरून उतरलास, तर इतर पण तुला मदतीचा हात देतील.

मी पळणार आणि तुम्ही फक्त माझ्या मागे पळा, हे योग्य नाही.

वडील म्हणून तुझी साथ मी देणार; पण ट्रस्टी म्हणून तुझ्या हटवादीपणे घेतलेल्या निर्णयाचा मी विरोध करणार. काम आपल्या जागी आणि पुत्रप्रेम आपल्या जागी. जिथे जे योग्य, तेच करावे. भोग-मोक्ष यात हाच भेद आहे.

**मयुरेश:** चला. माझा छोटू राम माझी वाट बघत असेल.

बाबा निघाले. प्रथमेशने थोड्या वेळ सोफ्यावर डुलकी घेतली. मयुरेशने बाबांना श्रीरामचे पद्माने काढलेले फोटो पाठवले. बाबा आपल्या नवीन नातवाचे फोनवर पापे घेत बसले, तेवढ्यात एक ई-मेल आली.

प्रथमेशने बोर्डाची लेखी माफी मागितली आणि वेगळ्या मार्गाने विचार करण्यासाठी थोडा वेळ मागितला होता. पुढील आठवड्यात परत भेटून त्यांना मार्गदर्शन आणि चर्चा करण्यासाठी अनुरोध केला होता.

आपली चूक पण वेळेत मान्य करता आली पाहिजे. तसे करता आले, तर माफी पण प्रदान होते आणि सर्वांचे आपले कार्य सिद्धीस नेण्यास मदत पण मिळते. अर्थात, आपल्या बरोबर सर्वजण वाटचाल करू शकतात आणि आपण वेगाने पुढे समृद्धीच्या मार्गावर वाटचाल करू शकतो.

***मूळ तत्त्वबोध:*** *श्री बाबा उर्फ श्री मंगलनाथ महाराज मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर*

\- **सौ. सुलक्षणा कुलकर्णी,** शिकागो

**काही तांत्रिक अडचणींमुळे या महिन्याच्या अंकात राशी भविष्य प्रकाशित करता येत नाही. अधिक माहिती उपलब्ध होताच आपणास लवकरात लवकर कळविण्यात येईल**

## मोरया

सूर्य कोटी झळकती तव आननी, रे मोरया I
तव प्रकाशे उजळते हे विश्व सारे, मोरया IIधृII

बुद्धी दे तू, ज्ञान दे
दे सजगता, विज्ञान दे
विवेक दे, संस्कार दे
विचार सारासार दे
तव कृपेने कोणतेही विघ्न हारे, मोरया II१II
तव प्रकाशे उजळते हे विश्व सारे, मोरया IIधृII

आधार दे, दे सावली
तू जगाची माऊली
तम दाटता जगतावरी
मन भरकटे भवसागरी
दाविशी नवपंथ तू उघडून द्वारे, मोरया II२II
तव प्रकाशे उजळते हे विश्व सारे, मोरया IIधृII

ओंकार तू, अनंत तू
आरंभ आणिक अंत तू
तत्त्व तू अन नित्य तू
चराचरातील सत्य तू
काळ तू, अवकाश आणि चन्द्र तारे मोरया II३II
तव प्रकाशे उजळते हे विश्व सारे, मोरया IIधृII

- **अनिता म. कांत**, सॅन रमोन, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## रोमन: एका दुर्बिणीचा दीर्घ प्रवास

फेब्रुवारी २०२६च्या अंकात याच सदरात नव्याने जाहीर झालेल्या Lazuli प्रकल्पाबद्दल लिहिताना Roman Space Telescopeचा उल्लेख आला होता; आता Roman उड्डाणाच्या उंबरठ्यावर येऊन पोचली आहे. हा अंक तुमच्या हाती पडेपर्यंत ती ३० ऑगस्टला फ्लोरिडातील Kennedy Space Center वरून SpaceX च्या Falcon Heavy रॉकेटवरून अवकाशात झेपावलेली असेल.

पण Romanची गोष्ट ३० ऑगस्ट २०२६ रोजी सुरू होत नाही. उलट, त्या दिवशी अनेक दशकांच्या कल्पना, बदल, अडथळे, तडजोडी आणि चिकाटी यांचा एक अध्याय संपतो आणि दुसरा सुरू होतो. विज्ञानात एखादी चांगली कल्पना सुचणे पुरेसे नसते. ती प्रत्यक्षात यायला कधीकधी वैज्ञानिकांच्या एका पिढीहून अधिक काळ जावा लागतो, याचे Roman हे उत्तम उदाहरण आहे.

**Romanच्या आधी WFIRST:**

१९९०च्या दशकाच्या अखेरीस विश्वाचा प्रसरणवेग कमी होत नसून वाढत आहे, हा धक्कादायक शोध लागला. हे नेमके कसे व का होते हे अजून माहीत नाही; त्या अज्ञात कारणाला आपण कृष्णऊर्जा (dark energy) हे नाव दिले आहे. कृष्णद्रव्याप्रमाणेच (dark matter) इथेही "कृष्ण" म्हणजे प्रकाशाच्या मार्गाने ज्याचा मागमूस लागत नाही ते. उत्सर्जन नाही, शोषण नाही, परावर्तन नाही. नाव चपखल असले तरी ते रूमाल टाकण्यासारखेच आहे; समज अजून दूर आहे: विश्वाचे प्रसरण गतिमान करणारे "काहीतरी" आहे, एवढेच आपल्याला माहीत आहे. त्याचा अधिक अचूक अभ्यास करण्यासाठी अवकाशातून मोठ्या प्रमाणावर आकाशाचे निरीक्षण करणाऱ्या दुर्बिणींच्या अनेक कल्पना पुढे आल्या. त्यांत Joint Dark Energy Mission (JDEM), Microlensing Planet Finder आणि इतर कल्पनांचा समावेश होता.

या वेगवेगळ्या धाग्यांमधून पुढे WFIRST (Wide Field Infrared Survey Telescope) या दुर्बिणीची संकल्पना तयार झाली. अमेरिकेत दर दहा वर्षांनी खगोलशास्त्रज्ञ पुढील दशकातील सर्वांत महत्त्वाचे वैज्ञानिक प्रश्न आणि मोठ्या प्रकल्पांचे प्राधान्य सामूहिकपणे ठरवतात. २०१०च्या अशा दशकीय आढाव्यात (Decadal Survey) WFIRSTला मोठ्या अवकाश-मोहिमांमध्ये सर्वोच्च प्राधान्य मिळाले.

अर्थात, वैज्ञानिकांनी "ही आपली पहिली पसंती" म्हटले म्हणजे दुसऱ्या दिवशी चेक लिहिला जात नाही. पुढे पैसा मिळवणे, आराखडा बदलणे, तंत्रज्ञान तयार करणे, खर्च आटोक्यात ठेवणे, आणि बदलत्या सरकारांना व काँग्रेसला हा प्रकल्प अजूनही करायलाच हवा हे पटवत राहणे, ही वेगळीच दीर्घ शर्यत असते.

आणि या शर्यतीत २०१२ साली एक विलक्षण वळण आले.

**गुप्तहेराचा डोळा आकाशाकडे:**

अमेरिकेचे हेरगिरी-उपग्रह सांभाळणाऱ्या National Reconnaissance Office (NRO) या संस्थेकडे वापरात न आलेल्या, २.४ मीटर व्यासाचे आरसे असलेल्या दोन दुर्बिणी पडून होत्या. पृथ्वीकडे पाहण्यासाठी तयार करण्यात आलेले हे तंत्रज्ञान त्यांनी NASAला दिले. २.४ मीटर म्हणजे Hubble Space Telescopeच्या मुख्य आरशाएवढाच व्यास. त्या वेळी WFIRSTसाठी यापेक्षा लहान आरशाचा विचार चालू होता. NASAने मग नव्याने मिळालेल्या या आरशांभोवती WFIRSTचा आराखडाच बदलला. यात एक सुंदर विरोधाभास आहे. पृथ्वीवर नजर ठेवण्यासाठी बनवलेल्या एका गुप्तचर यंत्रणेतील आरसा आता पृथ्वीपासून लाखो किलोमीटर दूर जाऊन विश्वाची टेहळणी करणार आहे.

मात्र NROकडून आरसे मिळाले, दुर्बीण नव्हे. NASAने नव्याने Romanची उपकरणे, अवकाशयान, संवेदक (detectors), विजेची व संगणकीय यंत्रणा आणि जमिनीवरची नियंत्रण-यंत्रणा हे सारे त्या आरशांभोवती गुंफले.

२०२०मध्ये WFIRSTला Nancy Grace Roman Space Telescope हे नाव देण्यात आले. Nancy Grace Roman या NASAच्या पहिल्या Chief of Astronomy. Hubble प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना अनेकदा "Mother of Hubble" म्हटले जाते. एका मोठ्या अवकाश-दुर्बिणीसाठी अनेक वर्षे संस्थात्मक लढाई लढलेल्या व्यक्तीचे नाव अशाच दीर्घ संघर्षातून जन्माला आलेल्या दुसऱ्या दुर्बिणीला मिळणे समर्पकच आहे.

**Hubbleच्या शंभरपट आकाश:**

Romanचा मुख्य आरसा Hubbleएवढाच असला तरी दोन्ही दुर्बिणींचा स्वभाव वेगळा आहे. Hubbleची आपण पाहिलेली अनेक प्रसिद्ध छायाचित्रे म्हणजे एखाद्या निष्णात छायाचित्रकाराने काढलेली विलक्षण बारकाव्यांची व्यक्तिचित्रे आहेत. Roman तितक्याच बारकाईने पण एकाच वेळी आकाशाचा बराच मोठा भाग पाहू शकते. तिच्या Wide Field Instrumentचे दृष्टिक्षेत्र (field of view) Hubbleपेक्षा सुमारे शंभरपट मोठे आहे. यातूनच Romanचे मुख्य विज्ञान येते.

विश्वाचा विस्तार कसा बदलत गेला? कृष्णऊर्जेचे स्वरूप काय असू शकते? अब्जावधी दीर्घिका (galaxies) अवकाशात कशा पसरल्या आहेत, आणि त्यांच्याकडून येणाऱ्या प्रकाशावर वाटेत असलेल्या पदार्थाच्या गुरुत्वाकर्षणामुळे कोणते सूक्ष्म परिणाम होतात, याचे मोजमाप करत Roman या प्रश्नांना भिडेल.

दुसरीकडे, आपल्या आकाशगंगेतील लाखो ताऱ्यांची निरीक्षणे ती वारंवार घेईल. एखाद्या दूरच्या ताऱ्यासमोरून दुसरा तारा आणि त्याची ग्रहमाला गेली, तर गुरुत्वाकर्षणामुळे मागच्या ताऱ्याचा प्रकाश काही काळ वाढतो. या परिणामाला गुरुत्वीय सूक्ष्मभिंग (gravitational microlensing) म्हणतात. अशा प्रकारे कोणत्याच ताऱ्याला बांधलेले नसलेले, आकाशगंगेत एकटेच फिरणारे मुक्त ग्रह (free-floating planets)सुद्धा Roman शोधू शकेल.

तिच्यावरचा प्रकाशरोधक (Coronagraph Instrument) हे अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक आहे: पुढच्या पिढीतील दुर्बिणींना लागणारे तंत्र आत्ताच अवकाशात तपासून पाहणे. ताऱ्याचा प्रखर प्रकाश अडवून त्याच्याभोवती फिरणाऱ्या अत्यंत अंधूक ग्रहाचा प्रकाश वेगळा काढणे, हे ते तंत्र. पृथ्वीसदृश ग्रह थेट पाहू शकणाऱ्या भावी दुर्बिणींच्या दिशेने ही पहिली पावले आहेत.

पण मला Romanचा आणखी एक पैलू विशेष आकर्षक वाटतो: अवरक्त (infrared) तरंगलांबींमध्ये ती आपल्याला बदलणारे आकाश दाखवणार आहे.

**बदलत्या आकाशाचे पहारेकरी:**

खगोलशास्त्रज्ञ दुर्बिणीला डोळा लावून आकाश "पाहत" नाहीत, हे तर कधीच इतिहासजमा झाले आहे. पण आतापर्यंत आकाशात काही नवे दिसले की त्याचा वर्णपट (spectrum) घेऊन ते नेमके काय आहे हे ठरवता येत असे. Romanच्या बाबतीत तेवढेही सोपे नाही: ती इतके अंधूक स्रोत टिपणार आहे की त्यांतल्या बहुतेकांचा वर्णपट घेण्याची ताकद आजच्या कोणत्याच दुर्बिणीत नाही. शिवाय ती मोठ्या क्षेत्राची अतिशय स्पष्ट छायाचित्रे पुन्हा पुन्हा घेणार. कुठे एखाद्या ताऱ्याचा स्फोट होऊन तो सुपरनोव्हा बनेल, कुठल्या दीर्घिकेच्या केंद्राजवळ कृष्णविवराने तारा गिळंकृत केल्याने अचानक प्रकाश वाढेल, कोणत्या ताऱ्याची तेजस्विता कमी-जास्त होईल; अशा असंख्य बदलांची माहिती सतत मिळत राहील.

मी ज्या RAPID (Roman Alerts Promptly from Image Differencing) गटात सहभागी आहे, त्याचे उद्दिष्ट याच्याशी संबंधित आहे. Romanकडून मिळणाऱ्या नव्या प्रतिमांमधून आधीची संदर्भ-प्रतिमा संगणकाद्वारे वजा केली जाईल. Romanच्या प्रत्येकच निरीक्षणावर ही प्रक्रिया करून, त्यात काही बदललेले आढळल्यास त्याची सूचना कमीत कमी वेळात जगभरच्या खगोलशास्त्रज्ञांपर्यंत जाहीरपणे पोचवणे, हे RAPIDचे मुख्य काम.

पण दोन चित्रे वजा केली की उरलेला प्रत्येक ठिपका म्हणजे नवा शोध नसतो! संवेदकांतील दोष, वैश्विक किरणे (cosmic rays), प्रकाशाचे विवर्तन (diffraction), दोन प्रतिमा किंचित वेगळ्या असणे; अशा अनेक कारणांनी बनावट बदल दिसतात. खरा खगोलीय बदल कोणता आणि प्रतिमा-प्रक्रियेतील अपघात कोणता, हे ओळखण्यास संगणकाला प्रशिक्षित करता येते. याला मशीन लर्निंग म्हणतात, आणि RAPIDमधले माझे काम यावरच आहे. यासाठी संगणकाला "असे असेल तर खरे, तसे असेल तर खोटे" असे नियम लिहून देता येत नाहीत; खऱ्या आणि खोट्या बदलांची लाखो उदाहरणे दाखवून त्यालाच फरक ओळखायला शिकवावे लागते. ही उदाहरणे जितकी अधिक आणि जितकी विविध, तितके हे ओळखणे सुकर आणि अचूक होते.

Romanशी संबंधित RISE (Roman High-redshift Transient Science) या दुसऱ्या गटातही माझे असेच काम चालू आहे; पण तिथला प्रश्न वेगळा आहे. RAPIDमध्ये खरे आणि खोटे वेगळे करायचे असतात; इथे खरे ठरलेल्या हजारो बदलांमधून अतिदूरचे, म्हणजे विश्वाच्या सुरूवातीच्या काळातले सुपरनोव्हा नेमके कोणते, हे ओळखायचे असते. तेव्हाच्या ताऱ्यांत हायड्रोजन-हीलियमपलीकडची जड मूलद्रव्ये फारच कमी होती; असे तारे मरताना आजच्यापेक्षा वेगळे आणि कधीकधी अतिप्रचंड स्फोट होतात. विश्वातल्या पहिल्या पिढीतल्या ताऱ्यांचा शेवट अशा स्फोटांमधूनच दिसू शकतो.

यात एक गंमत आहे. Romanने अजून आकाशाची एकही खरी वैज्ञानिक प्रतिमा घेतलेली नाही; पण ती घेईल त्या प्रतिमांमधले शोध ओळखणारी संगणकीय यंत्रणा आपण आत्ताच तयार करत आहोत. आधुनिक खगोलशास्त्रात दुर्बीण बनवणे आणि तिच्या माहितीचा अर्थ लावणारी संगणकप्रणाली व अल्गोरिदम तयार करणे या आता एकाच प्रयोगाच्या दोन बाजू आहेत.

**वेळ, पैसा आणि विज्ञान :** मोठ्या सरकारी वैज्ञानिक प्रकल्पांची चर्चा झाली की "उशीर झाला, खर्च वाढला" अशा बातम्या अधिक ऐकायला मिळतात. Romanची सध्याची स्थिती म्हणूनच उल्लेखनीय आहे. कोविडमुळे २०२१मध्ये तिच्या खर्चाचा आणि वेळापत्रकाचा अधिकृत आराखडा बदलावा लागला होता; पण त्यानंतर प्रकल्प त्या सुधारित खर्च मर्यादेत आणि वेळापत्रकात राहिला आहे. उड्डाणासाठी सज्ज होण्याची अधिकृत मुदत मे २०२७ ही होती. प्रत्यक्ष प्रक्षेपण ३० ऑगस्ट २०२६ला होत असेल, म्हणजेच चक्क त्या मुदतीच्या सुमारे आठ-नऊ महिने आधी.

हे फक्त प्रकल्प-व्यवस्थापनाचे कौतुक म्हणून महत्त्वाचे नाही. गेल्या काही वर्षांत NASAच्या विज्ञान-अर्थसंकल्पावर प्रचंड दबाव आला. २०२५मध्ये मांडलेल्या २०२६ सालच्या अर्थसंकल्पी प्रस्तावात NASAच्या Science Mission Directorateचा निधी जवळजवळ निम्मा (सुमारे ४७ टक्क्यांनी कमी) करण्याचा आणि अनेक चालू किंवा नियोजित मोहिमा बंद करण्याचा प्रस्ताव होता. New Horizons, Juno, OSIRIS-APEX आणि शुक्राकडे जाणाऱ्या DAVINCI व VERITAS यांसारख्या अत्यंत चांगल्या वैज्ञानिक मोहिमांवर टांगती तलवार आली. जानेवारी २०२६मध्ये काँग्रेसने हा प्रस्ताव जवळजवळ पूर्णपणे नाकारला; विज्ञानाचा निधी ७.२५ अब्ज डॉलरवर ठेवला गेला, म्हणजे आधीच्या वर्षापेक्षा जेमतेम एक टक्का कमी. पण त्याच निर्णयात Mars Sample Returnला मात्र पाठिंबा मिळाला नाही; खर्चवाढ आणि विलंबांच्या पार्श्वभूमीवर त्या मोहिमेचा मूळ आराखडा संपुष्टात आला.

Romanलाही यापूर्वी रद्द होण्याच्या प्रस्तावांना सामोरे जावे लागले आहे. "ती वेळेत आणि खर्चमर्यादेत होती म्हणूनच वाचली" असे थेट म्हणता येणार नाही. राजकीय निर्णय इतके सरळ नसतात. पण एखादी अब्जावधी डॉलरची वेधशाळा जवळजवळ पूर्ण तयार आहे, तिच्यावरचा बहुतेक खर्च आधीच झालेला आहे आणि ती नियोजित वेळेच्या आधी प्रक्षेपण-तळावर पोचली आहे; अशा वेळी तिला रद्द करण्याचा युक्तिवाद निश्चितच अधिक कठीण होतो.

यात विज्ञानासाठी एक धडाही आहे. चांगले विज्ञान असणे आवश्यक आहे; पण ते पुरेसे नसते. कल्पना टिकवून ठेवावी लागते, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते, तंत्रज्ञान जमवावे लागते, पैसा जबाबदारीने वापरावा लागतो आणि अनेक वर्षे पाठपुरावा करावा लागतो. दुसरीकडे, एखादा उत्तम वैज्ञानिक प्रकल्प रद्द झाला म्हणजे त्याचे विज्ञान वाईट होते, असाही अर्थ होत नाही.

**३० ऑगस्ट: एक नवी सुरुवात:**

Roman पृथ्वीपासून सुमारे पंधरा लाख किलोमीटरवरील सूर्य-पृथ्वी L2 या परिसराकडे जाणार आहे. तिथे पोचून उपकरणे तपासली जातील आणि नंतर तिचे खरे काम सुरू होईल. आपण आज कृष्णऊर्जा, परग्रह (exoplanets), दीर्घिका यांची यादी करतो आहोत. पण Hubble, James Webb आणि इतर दुर्बिणींच्या इतिहासाने एक गोष्ट शिकवली असेल तर ती ही: मोठ्या नव्या दुर्बिणींचे सर्वांत रंजक शोध अनेकदा ती बांधताना कुणाच्याही यादीत नसतात.

त्यामुळे उड्डाणाच्या दिवसाची माझ्यासाठीची उत्सुकता थोडी वेगळी आहे. एका बाजूला अनेक दशकांपूर्वी WFIRSTच्या आधी सुरू झालेल्या कल्पनांचा हा प्रत्यक्ष उड्डाणापर्यंत पोचलेला प्रवास आहे. दुसरीकडे, Romanने अजून आपल्याला एकही नवा खगोलीय शोध दिलेला नाही - अपेक्षित वा अनपेक्षित. असे शोध येतील याची खात्री आहे; पण कोणते, हे आज कुणालाच सांगता येणार नाही.

विज्ञानात चिकाटी म्हणजे जुन्या कल्पनेला हट्टाने चिकटून राहणे नव्हे. कल्पना बदलते, आराखडा बदलतो, तंत्रज्ञान बदलते, दुर्बिणीचे नावसुद्धा बदलते. टिकून राहतो तो नवे प्रश्न विचारण्याचा आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा हट्ट.




**Goddard Space Flight Center मधील निर्धूळकक्षाच्या (cleanroom) खिडकीतून दिसणारी Roman.**

छायाचित्र: आशिष महाबळ, मार्च २०२५.

**- आशिष महाबळ**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## घोर

सदान कदा हा जीवास घोर
नजरांचा रोख का माझ्या ओर
बंदुकींच्या जणू नळ्या रोखल्या
धनुष्यांच्या प्रत्यंच्या ताणल्या
म्यानातून तलवारी उपसल्या
मुष्टीयुद्धी मुठी आवळल्या
केला असा मी काय गुन्हा
उभा करती या तप्त उन्हा
फासी कुणा न फसवून चूना
फाशी का ही न करता खूना?
म्हणती हीच संमेलन काळजी ( anxiety )
मानसतज्ञ ओढती कायम माळ जी
स्वीकार तयांना असताना नाळ जी
दुर्लक्षून कुरतडे म्हणे आयुष्य राळ जी
प्रारंभ झाला याचा कधी
विचार येतो मनी कधी मधी
अस्वस्थ भाव हा चढवी गधी
मिळता क्षणाचा या अवधी
जाहीर मुखी हा स्पष्ट भाव
पण विरासतीत ना हा स्वभाव
दडपणांचा हा नकळत प्रभाव
का सबळ आत्मविश्वासी अभाव
सवईची ही वाईट्ट सवय
तुमच्याच संग वाढणे वय
जळवाच चिकटल्या जणू कायम
दारापल्याड हा सदा उभा यम
लाख कारणे जरी जडण्या गंड
समरी ठाकणे ठोकून दंड
पेटून उठणे करण्या बंड
जन्मठेपीचा न भरण्या दंड
तुम्ही बदलता लोक बदलले
तेच डोळे पण आता निवळले
विरोधातही क्वचित खवळले
आगमनी जणू भासे चमकले

- रवि गाडगीळ, नॉर्थ एडिसन, न्यू जर्सी

## अक्षरसंवाद - पत्रलेखन कला - काल, आज आणि उद्या

आज बऱ्याच दिवसांनी घर आवरायला घेतले होते आणि अचानकपणे जी गोष्ट मी पूर्णपणे विसरले होते ती म्हणजे एक नक्षीकाम केलेली लाकडी पेटी मला समोर दिसली. त्यावरचा हलकासा धुळीचा थर पुसता पुसता ती पेटी मला भूतकाळातच घेऊन गेली. अगदी निवडक पत्रे मी या पेटीत जपून ठेवली होती. भूतकाळातल्या आठवणींबरोबर मी पेटीतली पत्रे बघायला लागले. सगळ्यात वरच्या पत्रावर आईचे अक्षर पाहून लगेचच ते पत्र काढून वाचायला सुरवात केली. पत्रातली तिची काळजीवजा केलेली विचारपूस, पुढे वडीलांनी केलेली चौकशी सगळे वाचून मन भरुन येत होते. त्या कागदाला झालेला त्यांचा स्पर्श, त्यांचा आठवणींचा सुगंध जाणवत होता. पत्रातली अक्षरे जणू काही आपल्याशी बोलत आहेत असे वाटत होते.

आयुष्यातले महत्वाचे टप्पे, प्रत्येक नाती आणि प्रत्येक भावना कोणत्या ना कोणत्या पत्रातून व्यक्त होत असतात, म्हणूनच पत्र हा केवळ वैयक्तिक संवादाचा भाग न राहता  तो आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि साहित्याचाही अविभाज्य घटक बनतो. मराठी साहित्य आणि इतिहासात पत्रांचे एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी कारावासातून लिहिलेली पत्रे केवळ वैयक्तिक संवाद नव्हती, ती विचारांची, राष्ट्रप्रेमाची आणि धैर्याची प्रेरणा होती. वि. वा. शिरवाडकर यांच्या पत्रांतून साहित्यिक संवेदनशीलता, विचारांची खोली आणि माणुसकीचा स्पर्श अनुभवायला मिळतो, तर पु. ल. देशपांडे यांच्या पत्रांमध्ये त्यांचा सहज विनोद, आपुलकी आणि जिव्हाळा अगदी ओघवत्या शैलीत दिसतो. अश्या अनेक ऐतिहासिक आणि साहित्यिक पत्रांनी आपल्या संस्कृतीचा आणि भावविश्वाचा अमूल्य ठेवा जपला आहे.

म्हणून कागदावरले शब्द हे केवल शब्द नसतात, तर ते भावना, आठवणींचा अमुल्य ठेवा असतात. आई नेहमी म्हणायची की पत्र लिहिण्याची पण एक कला आहे. ज्यामुळे फक्त संवाद साधता येत नाही तर त्यामधून लिहिण्याऱ्याचे व्यक्तिमत्व दिसते.

योग्य भाषा, त्याची मांडणी, आदरयुक्त संबोधन, विचार मांडण्याची कला पत्रा पत्रातून दिसते. हा विचार येताच वडीलांनी त्यांच्या पहिल्या विमान प्रवासाचे कसे यथार्थ वर्णन केले ते आठवले. पूर्वी पत्र म्हणजे घराचा श्वास होता. पोस्टमनची सायकल दिसली की घरातली प्रत्येकाची नजर दाराकडे लागायची. पत्र आले आहे हे बघितले की कोणाचे, कोणासाठी हे समजण्यासाठी सगळ्यांचीच उत्सुकता असायची.

मुलगा वा मुलगी परगावी कामानिमित्त अथवा काही कारणाने गेले असताना त्यांनी खुशालीचे पाठवलेले पत्र. पूर्वी मुली बाहेरगावी सासरी गेल्यानंतर माहेरच्या आठवणींचे आई वडीलांना पाठवलेले पत्र. काही काही पत्रांमध्ये संपूर्ण आयुष्य सामावलेले असायचे.

आईची माया, वडिलांचे मार्गदर्शन, आजी-आजोबांचे आशीर्वाद, भाऊ-बहिणींची खोडकर मस्करी आणि आपल्या जिवाभावाच्या माणसांच्या असंख्य आठवणी हे सगळे भावविश्व एका लिफाफ्यात अलगद जपलेले असायचे.

त्याच बरोबर हस्ताक्षरात एक प्रकारची जादू असते. अक्षरांच्या वळणावरून लिहिणा-यांची मन:स्थिती दिसते. 'कशी आहेस गं? स्वतःची काळजी घेतेस ना', ह्या काळजी सुरातली भावना लपून राहतच नाही. तसे बघितले तर आजच्या काळामध्ये एका क्लिक मध्ये जगाशी संपर्क साधता येतो, पण पत्राने जे मनाला समाधान मिळते हे हजारो मेसेजेस  देऊ शकत नाहीत कारण पत्रे हे फक्त शब्दाचे माध्यम नसते तर भावना, नाते, आठवणी जपणारे जिवंत उदाहरण असते.

म्हणूनच दरवर्षी १ सप्टेंबर- लेटर राईटिंग डे, आपल्याला विचार करायला भाग पडतो, शेवटचे पत्र कधी लिहिले होते?

मोबाईल वरचे संदेश काही क्षणात वाचले जातात तसेच विसरले पण जातात. हस्ताक्षरातील पत्रे अनेक वर्षे जपून ठेवली जातात. त्यातले प्रत्येक शब्द, प्रत्येक ओळ, प्रत्येक स्वाक्षरी त्या व्यक्तिच्या भावना जिंवत ठेवतात. आजच्या टेक्नॉलॉजीने एकमेकांशी संवाद क्षणात साधता येतो पण त्यातली भावनांची खोली अनेकदा कमी झाल्याची जाणीव होते.

म्हणून वाटते भावना टाईप करून नव्हे तर स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून व्यक्त केल्या तर त्याची किंमत आधिक वाढते. स्वत:च्या हस्ताक्षरातला मेसेज किंवा आताच्या काळातला डिजीटल मेसेज, कोणता अधिक प्रभावी, भावना व्यक्त करणारा हा चर्चेचा विषय होऊ शकले हे नक्की.  हस्ताक्षरातल्या पत्रातून भावना, जिव्हाळा जाणवतो तर डिजीटल संदेशात वेग आणि सोय अधिक असते. हस्तलिखित पत्रामधले पत्र लिहिणाऱ्याचे हस्ताक्षर, वेळ, प्रयत्न दिसून येतात. त्यामुळे ते भावनिक, वैयक्तिक वाटते. डिजिटल

संदेशात तो वेगवान व सोयीस्कर असला तरी हस्तलिखित जगातला वैयक्तिक स्पर्श जाणवत नाही.

दोन्ही माध्यमाचे आपापले महत्व आहे. तातडीच्या रोजच्या संवादासाठी डिजिटल संदेश वापरावा तर भावना व्यक्त करण्यासाठी कायम स्वरूपी आठवण जपण्यासाठी स्वतःच्या हस्ताक्षरातले पत्रच लिहावे. परिस्थितीनुसार निवड करणेच सार्थ आहे. कागदावर लिहीलेली अक्षरे कधीच जुनी होत नाहीत ती काळाच्या प्रत्येक वळणावर आपल्या त्याच भावना जिवंत ठेवतात. असे म्हणता येईल की तंत्रज्ञानाने संदेश क्षणात पोहोचतो पण पत्रं आयुष्यभर सोबत राहतात. प्रत्येक पत्र एक आठवण बनून राहते आणि वर्षानुवर्षांनंतरही ते उघडले की भूतकाळ पुन्हा एकदा वर्तमानात येऊन उभा राहतो.

पत्र म्हणजे केवळ शब्दांचा नव्हे, तर काळालाही जपून ठेवणारा भावनांचा प्रवास आहे.

*'World Letter Writing Day' is celebrated globally on Sept. 1st.*

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

## कळेल का कधी तुला...!

पाहताना तुला नकळत तुझ्या,
हरवते मन माझे नकळत माझ्या,
मनातला अबोल प्रीतीचा बहर हा,
**कळेल का कधी तुला...!**
शोधते मी मला नजरेत तुझ्या,
पाहावेस तू मला तुला पाहताना,
अनामिक ओढ लागे नजरेची तुझ्या,
**कळेल का कधी तुला...!**
मनाचे तुझ्या भोवताली बावरणे,
शब्दांचे फिरूनी ओठांवरी थांबणे,
भावनांचे तुझ्याशी नजरेतूनी बोलणे,
**कळेल का कधी तुला...!**
ध्यास तुझाच मना जडला,
मी न उरले माझी आता,
तूच निनाद माझ्या अंतरीचा,
**कळेल का कधी तुला...!**

- **शुभदा जोशी-पारखी,** कोलंबिया, मेरीलँड

## ग्लोबल महाराष्ट्रीयन अवॉर्ड्स २०२७

जगभरात ठसा उमटवणाऱ्या महाराष्ट्रीयन कर्तृत्ववानांचा सन्मान करण्यासाठी 'ग्लोबल महाराष्ट्रीयन अवॉर्ड्स २०२७' चा शुभारंभ.

**मुंबई :** जगभरातील महाराष्ट्रीयन समाजाला एका व्यासपीठावर आणत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून जागतिक स्तरावर ठसा उमटविणाऱ्या महाराष्ट्रीयन कर्तृत्ववानांचा गौरव करण्याच्या उद्देशाने 'ग्लोबल महाराष्ट्रीयन अवॉर्ड्स (GMA) २०२७'ची घोषणा करण्यात आली. जीएमएचे संस्थापक-अध्यक्ष आमदार अमीत साटम यांनी ही माहिती दिली.

व्यवसाय, विज्ञान आणि तंत्रज्ञान, कला, सार्वजनिक सेवा, कायदा, माहिती-तंत्रज्ञान, शिक्षण, क्रीडा, आरोग्यसेवा, जीवनगौरव पुरस्कार आदी क्षेत्रांतील मान्यवरांचा होणार सन्मान.

या पुरस्कारामागील संकल्पना स्पष्ट करताना साटम म्हणाले की, व्यवसाय, विज्ञान, कला, सार्वजनिक नेतृत्व, सामाजिक सेवा आणि नवोन्मेष अशा विविध क्षेत्रांत जागतिक स्तरावर उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महाराष्ट्रीयन व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

जगभरातील महाराष्ट्रीयन व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वातून आणि नेतृत्वातून स्वतंत्र अशी जागतिक ओळख निर्माण केली आहे. **'ग्लोबल महाराष्ट्रीयन अवॉर्ड्स २०२७'** हा जगभरातील महाराष्ट्रीयन समाजाला एका व्यासपीठावर आणणारा, त्यांच्या योगदानाचा गौरव करणारा आणि महाराष्ट्राशी असलेले त्यांचे सांस्कृतिक व सामाजिक नाते अधिक दृढ करणारा उपक्रम आहे, असे साटम यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जानेवारी २०२७ मध्ये मुंबईत होणाऱ्या विशेष समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याचेही साटम यांनी सांगितले.

पुरस्कारांसाठी नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून, **१५ ऑक्टोबर २०२६** पर्यंत नामांकन करता येणार आहे. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती स्वतःचे नामांकन करू शकतात तसेच त्यांच्या कर्तृत्वाची माहिती असलेल्या व्यक्तींनाही त्यांचे नामांकन करता येईल, असे साटम यांनी स्पष्ट केले.

या पुरस्कारांच्या १० श्रेणी असून त्यामध्ये व्यवसाय, उद्योजक आणि कॉर्पोरेट नेतृत्व; विज्ञान, तंत्रज्ञान व नवोन्मेष; कला, साहित्य व संस्कृती; सार्वजनिक सेवा, राजकारण व नेतृत्व; कायदा;

माहिती-तंत्रज्ञान; शिक्षण; क्रीडा; आरोग्यसेवा तसेच जीवनगौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

या पुरस्कारांसाठी गठित करण्यात आलेल्या मान्यवर परीक्षक मंडळात भारताचे ५२ वे सरन्यायाधीश न्या. बी. आर. गवई, नामांकित शास्त्रज्ञ आणि नवोन्मेष क्षेत्रातील मार्गदर्शक पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रसिद्ध गायिका व संगीतकार वैशाली सामंत, आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'चे राजकीय संपादक आणि ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल मारपकवार यांचा समावेश आहे.

https://globalmaharashtrianawards.com/
Video link **(from MLA Amit Satam)**

## आला श्रावण

आला श्रावण, आला श्रावण
धरतीपाशी पाचूचे आंदण
    आला श्रावण, ऊन मखमली
    छेडित धारा, चिंब सावली
आला श्रावण, भक्ती पावन
बटव्यात आजीच्या, व्रतांची खाण
    आला श्रावण, सोमवार श्रावणी
    शिव-शंभू साठी, प्रांजळ आळवणी
आला श्रावण, दरवळ मेंदीचा
किणकिण चुडा, डौल पंचमीचा
    आला श्रावण, सागराशी वंदन
    चंद्रमा पुनवेचा, रेशमी बंधन
आला श्रावण, सवंगडी बालपणीचा
स्मरणातील चित्रे, चित्रात रंगण्याचा
    आला श्रावण, पेरित समृध्दि,
    गौर मायेची खेळुनी, रमती रिद्धी सिद्धी

**- चैत्राली काटे-यादव**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## आनंदाचे देणे



आनंदाचे देणे या लेखमालेत आपल्या वाट्याला आलेल्या कामातून आनंद घेण्यासाठी आणि इतरांना आनंद देण्यासाठी नेमके काय करायचे? प्रत्येक माणसाने त्याच्या वाट्याला आलेले काम कृतज्ञतेने करणे का गरजेचे आहे या विषयी आपण या लेखमालेत जाणून घेणार आहोत.

कॉर्पोरेट विश्वात सध्या एक प्रकारची अस्थिरता पाहायला मिळते. तंत्रज्ञानातील आधुनिक बदल किंवा आर्थिक मंदीमुळे लोकांना कामावरून कधीही काढले जाते, महत्त्वाचे प्रोजेक्ट लोकांच्या हातातून निघून जातात, कधी कधी हाती आलेली प्रमोशनची चांगली संधी हुकते, लोकांना नवीन जॉब मिळणे अवघड जाते. मी जेव्हा कॉर्पोरेट विश्वातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्वतःचा उत्कर्ष कसा साधायचा? याबाबत मार्गदर्शन करतो. तेव्हा मी त्यांना स्वतःची कंपनी, वरिष्ठ, सहकारी, कंपनीतील साधनसामुग्री अशा विविध गोष्टींबाबत कृतज्ञ राहायला शिकवतो. काही लोकांना सुरूवातीला हे पटत नाही. ते मला विचारतात की, "कंपनीची कृतज्ञता व्यक्त केल्याने काय होणार आहे? आम्ही जरी कंपनीबाबत प्रामाणिक राहिलो तरी कंपनीकडून आम्हाला तशीच वागणूक मिळेल याची काय गॅरेंटी. आम्हाला आमच्या जीवनात प्रगती करायची आहे. त्यामुळे आम्हाला नवनव्या संधी शोधून पुढे जायला हवे. नवीन संधी मिळण्यासाठी जुनी कंपनी सोडून देण्याचा विचार करायला हवा. सध्याचे दिवस वर्षानूवर्षे एकाच कंपनीत प्रामाणिकपणे काम करण्याचे नाहीत. साहजिकच अशा प्रकारे कृतज्ञता व्यक्त करून आमची प्रगती कशी होणार?" मी या लोकाना सांगतो की, "मी तुम्हाला नव्या नोकरीच्या संधी मिळवू नका असे मुळीच सांगत नाही. कारण प्रत्येकाला जीवनात प्रगती हवी आहे. नवीन नोकरी शोधणे, त्यासाठी प्रयत्न करणे हे त्यासाठी गरजेचे आहेच. फक्त नवीन संधी स्वीकारताना जुन्या कंपनीबाबत कृतघ्नतेने वागू नका. नवीन नोकरी लागल्यावर जुन्या कंपनीतील कामे अर्धवट टाकून, नोटीस पिरिएड पूर्ण न करता, हातातील कामे इतरांना योग्य प्रकारे हस्तांतरीत न करता, जुन्या कंपनी आणि वरिष्ठांना नावे ठेवत नवीन ठिकाणी जाऊ नका. माणसाच्या प्रगतीचे अधिष्ठान नेहमी कृतज्ञतेचे असायला हवे. लोकांना असे वाटते की कंपनी किंवा वरिष्ठ आमचा विचार करीत नाही मग आम्ही कंपनीचा आणि वरिष्ठांचा विचार कशाला करायचा.

कृतज्ञतेने वागणे हे शहाणपणाचे आहे. कृतज्ञतेमुळे माणसाची वृत्ती चांगली होते. कृतज्ञता माणसाला यशाच्या शिखराकडे नेणारी महत्त्वाची पायरी आहे. कृतज्ञता हा मानवी जीवनाचा पाया (Foundation) आहे. आपले जीवन घडविण्यासाठी अनेक लोकांचा हातभार लागत असतो. तुम्ही ज्या कंपनीत काम केले ती कंपनी, कंपनीतील माणसे, साधनसामुग्री, वरिष्ठ, सहकारी, कंपनीतील मदतनीस अशा अनेकांमुळे आजवर तुमची प्रगती झालेली आहे. ती कंपनी होती म्हणून तुम्हाला नोकरी मिळाली. सहकाऱ्यांनी मदत केली म्हणून तुम्ही उत्तम रीतीने काम करू शकला. नोकरीची संधी देणारे, तुम्हाला ट्रेनिंग देणारे वरिष्ठ होते त्यामुळे नवीन नवीन गोष्टी शिकून तुम्ही तुमचे ज्ञान अपडेट केले. या सर्व गोष्टींमुळे तुमचे काम अधिक चांगले झाले. त्यामुळे या लोकांनी केलेल्या सहकार्याची जाण ठेऊन माणसाने कृतज्ञतेने वागले पाहिजे. उपकारांची जो जाण ठेवतो त्याला 'कृतज्ञ' असे म्हणतात त्याचप्रमाणे केलेल्या उपकाराची जो जाण ठेवत नाही त्याला 'कृतघ्न' असे म्हणतात. वास्तविक माणसाने जीवनात सर्वांबद्दल कृतज्ञ असायला हवे.

"जेव्हा 'तज्ञ' माणूस 'कृतज्ञ' होतो तेव्हा तो 'सुज्ञ' होतो."

जो माणूस सर्वांबद्दल कृतज्ञ असतो त्याला निसर्गनियमांनुसार म्हणजेच सर्वांकडून चांगला प्रतिसाद मिळतो, सहकार्य मिळते आणि दिवसेंदिवस त्या व्यक्तीची प्रगती होत जाते. या उलट जो केलेल्या उपकारांची जाण ठेवत नाही त्याला निसर्गनियमांकडून देखील त्याचप्रमाणेच उलट प्रतिसाद मिळतो. त्यांची प्रगती तर होत नाहीच शिवाय त्याच्या प्रत्येक कामात अडथळे निर्माण होतात.

यासाठीच कंपनीने तुम्हाला जितके दिवस काम करण्याची संधी दिली, जे काम शिकविले, कंपनीकडून तुम्हाला जे काही उत्पन्न मिळाले, ज्या ज्या लोकांचे सहकार्य मिळाले त्या सर्व गोष्टींबद्दल कृतज्ञ राहा. कृतज्ञ भावनेतून जुन्या कंपनीतील सर्व कामे पूर्ण करून मगच नवीन कंपनीतील काम स्वीकारा. कृतज्ञ वृत्तीमुळे तुमची विचार करण्याची, इतरांना प्रतिक्रिया देण्याची पद्धत सुधारते. लोकांसोबत असलेले तुमचे नातेसंबंध सुधारतात आणि तुम्हाला त्यांच्याकडून अधिकाधिक मदत आणि सहकार्य मिळते. तुमच्याकडे जे आहे, तुम्हाला जे मिळाले आहे त्याबद्दल तुमच्या मनात कृतज्ञ भाव निर्माण होतो. या भावामुळेच तुमची जीवनात 'भरभराट' होत जाते.

त्याचप्रमाणे कंपनी किंवा ऑफिस जिथे अनेक माणसे एकत्र काम करतात तिथे थोडेफार राजकारण हे असतेच. तुम्ही ऑफिसमध्ये चालणारे राजकारण किंवा कंपनीत चालणाऱ्या चुकीच्या गोष्टी कमी करू शकत नाही. पण जेव्हा तुम्ही लोकांबद्दल कृतज्ञ असता तेव्हा त्या चुकीच्या गोष्टींचा तुमच्यावर वाईट परिणाम होत नाही. कृतज्ञतेची भावना तुम्हाला अशा चुकीच्या गोष्टींपासून अलिप्त ठेवते. समजा एखादा बॉस चुकीचा वागत असेल तर त्याचा राग किंवा द्वेष करून काहीच उपयोग होत नाही. उलट त्या बॉसबद्दल कृतज्ञ राहिल्याने तुमच्या मनातील त्याच्याबद्दल असलेली रागाची, द्वेषाची भावना हळू हळू कमी होत जाते. तुमच्या मनातील कृतज्ञता भावामुळे तुम्ही त्या व्यक्तीशी मनातून जोडले जाता. ज्यामुळे त्याच्या मनात असलेली तुमच्याबद्दलची नकारात्मक भावना कमी होत जाते. समोरची व्यक्ती स्वभावाने कशीही असली तरी ती तुमच्याशी मात्र अनुकूल वागते. कृतज्ञतेने त्या व्यक्तीचा मूळ स्वभाव बदलत नसला तरी कृतज्ञतेमुळे त्या व्यक्तीचे तुमच्याबाबत असलेले मत चांगले होते.

कृतज्ञता ही एक 'शक्ती' असून तुम्हाला जीवनात सर्व काही मिळवून देण्याचे सामर्थ्य या शक्तित आहे. कोणतीही शक्ती स्वतःहून काही करीत नाही. तुम्ही त्या शक्तिचा वापर कसा करता यावर त्या शक्तिचा परिणाम दिसून येतो. कृतज्ञतेचेही तसेच आहे तुम्ही जितके कृतज्ञ व्हाल तितके तुम्हाला या शक्तिचे चांगले परिणाम दिसू लागतात. कृतज्ञता शक्ती तुम्हाला जीवनात सर्व काही मिळवून देण्यास समर्थ आहे. पण त्यासाठी या शक्तीवर तुमचा दृढ विश्वास असायला हवा. तुमचा कृतज्ञतेवरील विश्वास कधीच डगमगता कामा नये. कारण एखादी छोटीशी गोष्ट कृतज्ञेतेने पटकन मिळते पण कधी कधी मोठी गोष्ट मिळायला थोडा वेळ लागतो. अशा वेळी थोडा वेळ जरी लागला तरी मनातील कृतज्ञता भाव कमी होता कामा नये. समजा कृतज्ञ राहूनही जरी तुमचा जॉब गेला तर तुमचे नुकसान होत नाही. कारण पुढे त्याहून चांगली जॉबची संधी तुम्हाला मिळू शकते, एखादा प्रोजेक्ट हातून गेला तरी त्याहून चांगल्या प्रोजेक्टची संधी तुम्हाला मिळू शकते. कारण कृतज्ञतेमुळे जीवनात तुम्हाला जे चांगले आणि जे उत्तम तेच प्राप्त होते.

यासाठीच तुमच्या जुन्या आणि नव्या कंपनीबद्दल, ऑफिसमध्ये तुमच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल, ऑफिसमधील वस्तूंबद्दल कृतज्ञ राहा. कामातून आनंद मिळविण्याचा आणि कामातून इतरांना आनंद देण्यासाठी कृतज्ञ राहणे खूप गरजेचे आहे.

कृतज्ञता ही शक्ती, युक्ती, भक्ती व साधना आहे. कृतज्ञता हा चुंबक, गोंद आहे. कृतज्ञता हे पुण्य, शुभचिंतन व शहाणपण आहे. कृतज्ञता हा "सुखाचा राजमार्ग" आहे.

- **प्रल्हाद वामनराव पै**, आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## पारिजात

नवा नवा पारिजात लावला सानुकला वृक्ष अंगणी
नवी नवी चार गोंडस फुले फुलली पहिल्या श्रावणी
नाजुक फुले दंडांत केशरी शिरी धवल दले लेऊनि
पहाटे वारा वाटती पुष्पसुगंध निज डोईवरी घेऊनि
करी कारीगिरी पाऊससरी भरी पानांत हिरकणी
मढला पर्णजडित पाचूरंगी गुणी शिल्पी जणू कुणी
छायेत उभी हिरवी तुळशी लाल वृन्दावनी चौकोनी
मंजिरींत सजली साजरी सुवास तिच्याही पानोपानी
हर्षली माउली हरितजीवांना बघता दारी पुण्य पर्वणी
आठवुनी काहीतरी विस्मय करी ती देवभोळी गृहीणी
म्हणे दोन गिरीधारीपुजारी करुनि तयारी सज्ज श्रावणी
प्रिय दोन्ही पुष्प त्याचे नि तिच्या मंजिरी अर्पती श्रीचरणी।

- **ज्योत्स्ना काटकर नारनवरे,** केंडल पार्क , न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. राहुल देशमुख आणि सचिव श्री. अमित कोरडे यांची मा. श्री. मोहन भागवतजी यांच्यासोबत सदिच्छा भेट*मराठी समाज, संस्कृती आणि समाजकार्याशी संबंधित विविध विषयांवर यावेळी अर्थपूर्ण संवाद साधण्यात आला.




## दिवाळी अंक आवाहन २०२६

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्तातर्फे प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकाचे हे गौरवशाली ४३ वे वर्ष आम्ही पुन्हा एकदा दिमाखात साजरे करत आहोत. या निमित्ताने, उत्तर अमेरिका तसेच भारतातील सर्व मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकार आणि साहित्यप्रेमींना 'बीएमएम वृत्त दिवाळी अंक २०२६' साठी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आपले लेख, कथा, कविता, लघुनिबंध, नर्म विनोद, चुटके, प्रवासवर्णन, पाककृती तसेच कलात्मक रेखाचित्रे आम्हाला अवश्य पाठवावीत. या अंकाला अधिक समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि बहुरंगी बनविण्यासाठी आपले मौलिक योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे आपली सर्जनशील अभिव्यक्ती व कल्पकता जगभरातील वाचकांसमोर सादर करण्याची ही एक अनमोल संधी आम्ही आपणांस उपलब्ध करून देत आहोत.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: १० सप्टेंबर २०२६**

**अपेक्षित साहित्य व मर्यादा:**

- कथा / लेख / निबंध: १००० शब्द (फोटोशिवाय)
- कथा / लेख / निबंध: ८०० शब्द (फोटोसह)
- चुटके: १५० शब्द
- पाककृती / संकीर्ण माहिती: ३०० शब्द
- कविता: २० ओळी
- चित्रे / व्यंगचित्रे: उच्च प्रतीची डिजिटल प्रत

**मार्गदर्शक सूचना:**

- साहित्य स्वतःचे, मूळ मराठी भाषेत असावे आणि पूर्वप्रकाशित नसावे.
- अनुवादित किंवा रूपांतरित साहित्य असल्यास मूळ लेखकाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
- निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
- आवश्यकतेनुसार संपादकीय बदल करण्याचा अधिकार संपादकांकडे राखीव आहे.
- निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.
- लेखकांनी नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

**साहित्य पाठवण्याची ई-मेल:** vrutta@bmmonline.org

**ई-मेल विषय:** "Diwali Ank 2026"

**सूचना:**

1. मराठीत टायपिंग करण्यासाठी www.google.com/transliterate वापरता येईल व नंतर ते Word मध्ये सेव्ह करून ई-मेलद्वारे पाठवावे.

2. जर कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने वापरली जात असतील, तर ती अत्यंत सावधगिरीने वापरली जावीत; जेणेकरून मजकुराचा ओघ, मौलिकता आणि अस्सलपणा अबाधित राहील आणि त्यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही.

3. बहुतांश लेख हे लेखकाच्या स्वतःच्याच आवाजात रेकॉर्ड केले जातात. तुमचा लेख निवडल्यास, तुम्हाला एक रोमांचक संधी - 'व्हॉईस-ओव्हर आर्टिस्ट'प्रमाणे तुमचा स्वतःचा ऑडिओ रेकॉर्ड करा. यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती तुम्हाला पुरवली जाईल.

आपल्या उत्तम आणि वैविध्यपूर्ण साहित्याच्या प्रतीक्षेत,
आभारी आहोत,

**- बीएमएम वृत्त टीम**



We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue.
The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Waterlilies***

**Artist: Shubhangi Mantri**
Dimensions: 30″x38″
Medium:Water Colors
Price:$ 950
Mandal: DFWMM



***Hawaiian Ginger***

**Artist: Neelima Gole**
Dimensions:12″ x 9″
Medium: watercolor
Price:$ 350
Mandal: M M of Jacksonville



***Farmhouse***

**Artist: Alka Vaidya**
Dimensions:
Medium: watercolor
Price:$ 150
Mandal: EBMM



**Artist: Radha kirtane**
Dimensions: 12 ″x12″ wood panel
Medium:Encaustic (wax and pastel, pen)
Price:Not for Sale
Mandal: Tennessee MM



***Live wedding of H&R.***

**Artist: Medha Atre-Kulkarni**
Dimensions:16″x 20″
Medium:Acrylic on canvas
Price:Not for Sale
Mandal:Marathi Vishwa, NJ



***Reflection***

**Artist: Sunil Parulkar, M.D.**
Dimensions:16" x 20"
Medium:Watercolor and ink pen
Price:Not for Sale
Mandal:Columbus MMandal (CMM)

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.



AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com


ICICI Bank
USA
Remit money to any bank in India with Money2India
Promo Code IND40
for an enhanced rate of 40-paise*
Key Features:
Competitive exchange rates and instant transfers**
Zero fee for transfers above USD 1,000
Send USD 300,000 or more in a single transaction#
Scan the code to register now
575, 5th Avenue, Suite 2600, New York, NY 10017
+1-646-827-8450
moneytoindia@icicibank.com
www.money2india.com
T&Cs apply.
*The 40-paise better rate applies to the first transfer up to USD 1,500. Standard rates apply for additional amounts. The offer is valid for new customers for 60 days from the date of registration.
**Instant transfers are available only to express customers and credit usually takes less than 4 hours and depends on US and Indian banking hours.
#Transactions above USD 300,000 require additional documentation and approvals, as per applicable regulations.

# *Neem*
# For Your Soil.

100% Neem Cake Organic Plant Fertilizer




+ natural pest & pathogen control

+ slow-release

+ improves soil texture

WONDERTREE™ *Organics*

**BETTER GARDENING THROUGH BETTER SOIL**

# Bank of Maharashtra

VALID TILL 30th Sep'26



## ATTRACTIVE FCNR DEPOSIT RATES

**Secure & grow your foreign currency savings with Bank of Maharashtra**

**US DOLLARS**

| 6.15% | 6.25% | 6.60% |
|---|---|---|
| 3-4 Years | 4-5 Years | 5 Years Only |

**SAFE & SECURE** — Deposits are held with a trusted Indian Bank

**ATTRACTIVE RETURNS** — Earn higher interest rates on your foreign currency

**FLEXIBLE TENOR** — Choose tenor that suits your financial goals

**FCY [USD] LOAN** — Avail loan against your FCNR(B) deposit

### WHY CHOOSE FCNR DEPOSITS?

- Deposit in Foreign Currency, Earn in Foreign Currency
- Repatriable principal and interest
- Hedge against currency fluctuations
- Ideal for NRIs, PIOs & OCIs
- Loan facility available against FCNR(B) deposits

### LEGEND LOAN FACILITY ON FCNR(B) DEPOSIT (USD) VIA IFSC BANKING UNIT

Under this facility, your FCNR(B) deposit is lien-marked in favour of our IFSC Banking Unit, GIFT City. Based on the lien, we will extend a foreign currency loan to you against a prescribed margin. You continue to earn interest on your FCNR(B) deposit while paying interest and applicable fees on the loan, thereby enhancing your overall return on your capital.

### ILLUSTRATION: SPECIAL LOAN AGAINST FCNR(B) DEPOSITS

**SCHEME FEATURES**

- Flexible Tenure Options (Min 3 years and max 5 years)
- Tax Exempt & Fully Repatriable Funds
- Loan Multiplier (Up to 9x Initial Deposit)

**SCHEME ILLUSTRATION**

Customer Deposit **USD 100,000** (9x loan)

Maximum Loan **USD 900,000**

Total FCNR Deposit **USD 1,000,000**

**LOAN INTEREST RATE (IBU)**

| TENOR | ROI (p.a.) |
|---|---|
| 3 Years | 5.85% |
| Above 3 Years up to 5 Years | 6.00% |

### KEY BENEFITS

- Enhanced returns through FCNR(B) deposit leveraging strategy
- Attractive effective yields compared to standalone deposits
- USD-denominated investment, mitigating INR exchange rate risk
- Fixed Loan Rate ensures zero interest rate risk

The 5-year tenure offers the highest effective yield, making it the most rewarding option for customers seeking enhanced USD returns.

### SPECIAL FCNR(B) DEPOSIT RATES & OVERALL EFFECTIVE YIELD

| PARTICULARS | 3 YEARS (6.15%) | 4 YEARS (6.25%) | 5 YEARS (6.60%) |
|---|---|---|---|
| Customer Contribution | USD 100,000 | USD 100,000 | USD 100,000 |
| Loan Amount | USD 900,000 | USD 900,000 | USD 900,000 |
| Total FCNR Deposit | USD 1,000,000 | USD 1,000,000 | USD 1,000,000 |
| FCNR Deposit Rate (p.a.) | 6.15% | 6.25% | 6.60% |
| Loan Interest Rate (p.a.) | 5.85% | 6.00% | 6.00% |
| **ANNUALISED RETURN** | **9.77%** | **9.76%** | **14.81%** |

**LOCK-IN PERIOD 1 YEAR**

**Note:** Interest rates are per annum (p.a.) and compounded half-yearly. Illustration above is indicative. Actual results may vary based on exact tenor, compounding frequency and other applicable charges as per scheme terms.



bvg
Humanity Ahead
BVG INDIA LTD
India's Largest Integrated Services Company
Started in 1997 with a team of 8, Currently having 1,00,000+ Employees 205+ Cities in 29 States & UTs of India
1400+ Clients across India from all the sectors 2500+ Operating Sites – Maintaining an area of 650 Mn+ Sq. Ft.
1500+ Ambulances with skilled staff & equipment, helped 15 Mn+ patients 1000+ First Response Vehicles, helped 19 Mn+ citizens
2 Mn+ Sq. Mt. greenery maintained & 1 Mn+ trees planted Waste Management of 3500+ MT
EXCLUSIVE SERVICES FOR BMM MEMBERS
Airport & Travel Assistance
• Airport Meet & Greet
• Pickup & Drop Services
• Chauffeur-driven Vehicles
• End-to-End Travel Coordination
• Hotel & Stay Arrangements
Medical Tourism & Health Care
• Online Doctor Consultation
• Hospital Selection & Second Opinions
• Admission Assistance
• Treatment Planning
Elder & Parent Care
• 24×7 Emergency Assistance
• Ambulance Support
• Health Check-ups
• Home Nursing & Caregivers
• Senior Citizen Support Services
Spiritual & Pilgrimage Assistance
• Temple Darshan Planning
• VIP Darshan Coordination
• Religious Tours
• Accommodation & Travel Management
Property Care & Management
• Property Inspections
• CCTV Monitoring
• Property Maintenance
• Legal & Revenue Representation
• Tenant & Rental Management
Exclusive Member Benefits
• Priority Assistance
• Preferential Pricing
• Dedicated Support Team
• Access to Verified Service Partners
Hanmantrao Gaikwad
Chairman & MD, BVG Group
BVG LIFE SCIENCE LTD
Blending Traditional Knowledge with Modern Scientific Methods!
• Cancer Care
• Heart Care
• Liver Care
Contact no.: +91 7722 00 2581
Toll Free No.: 1800 268 1818
www.bvglife.com
BVG INDIA LTD
Address : Midas Tower, 4th Floor, Phase 1, Rajiv Gandhi Infotech Park, Hinjawadi, Pune, Maharashtra 411057
www.bvgindia.com www.bmmonline.org/bvg/
bmm@bvgindia.com +918055 99 2227




Where Your Journey Begins.
Discover your perfect home.
We believe in creating living spaces that are more than just a place to stay they are the foundation for your future.
JOURNEY SO FAR
43+ Years of legacy
120+ Completed projects
32+ Lakhs sq. ft. developed area
2200+ Happy customers
020-25654110 | +91 9134 616161, +91 9134 717171
sales.pune@kotibhaskar.com | www.kotibhaskar.com
KOTIBHASKAR
Infrastructures & Developers Pvt. Ltd.
आम्ही मनात घर करतो



SYMBIOSIS
INTERNATIONAL (DEEMED UNIVERSITY)
॥वसुधैव कुटुम्बकम्॥
Pune | Nashik | Bengaluru | NOIDA | Hyderabad | Nagpur | Dubai (UAE)
A legacy of 50+years
"Promoting International Understanding through Quality Education"
Represented by
Dr. Rajiv Yeravdekar
MD, Ph.D, FRCPS (Glasgow) FRCOG (London)
Provost,
Faculty of Medical & Health Sciences
SIU
Law
Design
Management
Medical & Health Sciences
Computer Studies
Media & Communication
Humanities & Social Sciences
Education
Engineering
Please visit: www.siu.edu.in
scan to know more
Jammu & Kashmir
Himachal Pradesh
Punjab
Uttarakhand
Haryana
Uttar Pradesh
Rajsthan
Gujarat
Madhya Pradesh
Bihar
Jharkhand
West Bengal
Sikkim
Arunachal Pradesh
Assam
Meghalaya
Nagaland
Manipur
Mizoram
Chhattisgarh
Odisha
Maharashtra
Telangana
Goa
Andhra Pradesh
Karnataka
Tamil Nadu
Kerala
QS WORLD UNIVERSITY RANKINGS 2027
655th Globally
19th in India
Times Higher Education Sustainability Impact Ratings 2026
301 – 400 in the world
6th in India
शिक्षा मंत्रालय MINISTRY OF EDUCATION
Category - I University
NAAC A++
nirf NATIONAL INSTITUTIONAL RANKING FRAMEWORK (Government of India)
24th in the University Category
7th in Law Category
11th in Management Category
46th In Engineering Category




Shreepati Group
Reaching new skies

"Aaradhya Avaan" Project is being jointly developed by Shreepati Skies (R R Chaturvedi) ("Promoter 1") and Man Vastucon LLP ("Promoter 2") (collectively "Promoters") via MahaRERA registration no. P51900048675. The details of the said Project are available on the website of MahaRERA at https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. All Brochures/ Leaflets/ Pamphlets/ ads/ walk through presentations/ master plan/ layout plan or any other document including photographs, images, designs, 3D models, plans, specifications, layout, dimensions, facilities, vegetation, features, furniture & fixtures, amenities and communication, are merely an artistic impression and imagination and may vary to actual project on site. The actual and physical features, amenities and facilities in the said Project or the flat/apartment/unit would be in accordance with plans and specifications approved by the competent authorities. The said Project is mortgaged in favour of IDBI Trusteeship Services Limited [acting as Security Trustee for Indusind Bank Limited ('the Lender')]. No Objection Certificate from the Lender will be provided for sale of flat/apartment/unit in the said Project, if required.




Shreepati Group
Reaching new skies
M MEHTA™ LEGACY REALTY

This communication is purely conceptual and not a legal offering. The project amenities and facilitates are subject to final approval by the concerned authority. The list of standard offerings, amenities and other details are available for verification at site. Intending purchasers are requested to verify all the details before acting in any manner with respect to the projects. The projects are mortgaged in favour of IDBI Trusteeship Services Limited acting as Security Trustee for IndusInd Bank Limited. Disclaimer: No animals were harmed in this campaign.


Are you investing in real estate, or peace of mind?
YASHADA REALTY
LIVYNG, REIMAGINED
PUNE • INDIA
Homecoming Reimagined at Yashada Realty. Thoughtfully designed homes and commercial spaces, in prime locations, connectivity, facilities and thriving communities combined with international quality standards and amenities.
NRI PRIVILEGE PROGRAM
2%
STAMP DUTY WAIVER*
*Will be paid by developer
For Details & Registration
+91 89565 47323 | nri@yashadarealty.com
ONGOING PROJECTS
Ravet
Punawale
Baner
Wakad
Mamurdi



The World.
On Your Terms.
Travel when you want.
Where you want.
With whom you want.
A family vacation to Europe. A spiritual journey in India. A scenic rail journey through Switzerland. An African safari. A self-drive holiday in New Zealand. A cultural journey through Japan or Bali. Or something completely your own.
At Veena World, we believe no two travellers are alike. That's why we create holidays designed around your time, your budget, your interests and your travel style.
You Explore.
Choose your destination, Choose your travel dates, Choose your experiences.
We Handle the Rest.
We'll take care of the planning, coordination and support. Whether you're travelling as a couple, with family, with friends, or celebrating a special milestone, we'll help create a holiday that's uniquely yours
Let's Plan Your Perfect Holiday. Connect with your nearest Veena World Travel Affiliate in the USA or get in touch with Veena World USA Inc.
Customized Holidays by Veena World
www.veenaworld.com I customizedholidays@veenaworld.com I Call: +1 903 648 5240
New York City - Swarga Travel Ready LLC +1 6318770741
New Jersey, Colonia - Travelscape +1 8483631435
North Carolina - Bliss Tours LLC +1 9842662053
Georgia, Alpharetta - Blossom Journeys +1 2035549121
Georgia, New Norcross - Madhu Patel +1 7705249717
Chicago, Palatine - Pachamama Travels +1 8473406843
Michigan, Novi - SWAMI Tours and Travels +1 2489803736
Indiana, Carmel - Saffron Holidays +1 4804695875
Missouri, St. Louis - mPath Services +1 3148823360
Veena World ← USA → Travel Affiliates
Texas, Houston - Tripcrafters +1 8329235716
Colorado Springs - Worry Free Travels LLC +1 7193521797
California, Sacramento-Dhaval Bilimoria +1 9164718162
California, Pleasanton - Golden Setu +1 9256602522
California, San Jose-Dipali Khangaonkar +1 4083161050
Washington, Bonney Lake - Kavitha Nandy +1 4252190869
Washington, Lynnwood - Shruti Sathe +1 9726559248
Fayetteville, Arkansas - WorldWide Wander +1 4694731311
OSA Toronto, Canada-Pratibha Hukerikar +1 (416) 8786879
VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.